





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २९.०८.२०२६ | अंक नं. १२८ | वर्ष ६१ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020







# मनोज जरांगे पाटलांचे ११ वे आमरण उपोषण सुरू

## मराठा आरक्षणासंदर्भात सरकारने लवकर निर्णय घेतला नाही तर मुंबईला जाण्याचा दिला इशारा



आंतरवाली सराटी - मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्ट रोजी सकाळ पासून आंतरवाली सराटी येथे आपले ३ वर्षातील ११ वे आमरण उपोषण सुरू केले आहे. जीवघेणा लढा आता सुरू झाला आहे, अंमलबजावणी झाल्याशिवाय आता माघार घेणार नाही. सरकारने लवकर निर्णय घेतला नाही तर मुंबईला जाणार, असा थेट इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी राज्य सरकार, जात पडताळणी समिती आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर जोरदार ताशेरे ओढले.

मनोज जरांगे म्हणाले की, दोन महिने, चार महिने करत सरकारने तीन वर्षे वेळकाढूपणा केला. आता आमच्या लक्षात आले आहे की सरकारच्या नियतीतच खोट आहे. त्यांना मराठ्यांच्या मुलाबाळांचे कल्याणच होऊ द्यायचे नाही. त्यामुळे आता सर्व मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्याशिवाय मी इथून उठणार नाही.

### जात पडताळणी समिती कायमची बरखास्त करा

कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्रांच्या वैधतेवर बोलताना जरांगे यांनी जात पडताळणी प्रक्रियेवर मोठा आक्षेप घेतला. तहसीलदार, एसडीएम किंवा सक्षम अधिकारी सगळे पुरावे तपासूनच कुणबी प्रमाणपत्र देतात, मग पुन्हा जात पडताळणी कशासाठी? देशातील इतर राज्यांमध्ये अशी समिती नाही, मग ती फक्त महाराष्ट्रातच का? जात पडताळणी अधिकारी जाणुनबुजून मराठा मुलांची अडवणूक करतात. पैसे दिले की त्यांचे 'कीस' पडत नाहीत, नाही दिले की कागदपत्रांमध्ये मुद्दाम चुका काढल्या जातात. यामुळे लोकांचे हेलपाटे होतात आणि ॲडमिशन्स कॅन्सल होतात. त्यामुळे इतर राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातील 'जात पडताळणी समिती' कायमची बरखास्त करावी, अशी मोठी मागणी त्यांनी केली. या निर्णयामुळे मराठाच नव्हे तर ओबीसी आणि एसटी प्रवर्गातील गरीब लोकांचेही कल्याण होईल, असे ते म्हणाले.

### मराठा समाजाला आवाहन- आपली मुले अधिकारी बनवा

मराठा समाजाला भावनिक साद घालताना जरांगे पाटील म्हणाले, आज प्रशासनात इतर जातींचे अधिकारी बसले आहेत, ज्यांना आपल्याबद्दल द्वेष आहे. अधिकारी हा जात विसरून सर्वांसाठी काम करणारा असावा, पण काही जणांच्या डोक्यात घाणेरडे विचार आहेत. त्यामुळे मराठा समाजाने आता शहाणे व्हावे, आरक्षण मिळवून आपली मुले प्रशासनात अधिकारी बनवा. तरच पुढच्या पिढीचे वाटोळे टळेल. आता कुणीच घरी बसू नका, सगळे जण आंतरवालीत या. या सरकारला मराठ्यांची बलाढ्य ताकद दिसली पाहिजे. सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय आता शांत बसायचं नाही. गाफील राहू नका, दगाफटका होईल, प्रत्यक्ष आंदोलनात सहभागी व्हा, असेही ते म्हणाले.

### मुंबईची तारीख आणि पुढची दिशा

मराठा क्रांती मोर्चाच्या 'एसईबीसी आरक्षण टिकले पाहिजे' या मागणीचे त्यांनी स्वागत करत ती योग्य भूमिका असल्याचे म्हटले. तसेच, सरकारकडून कोणी चर्चेला येणार का, या प्रश्नावर त्यांनी आज संध्याकाळी ५ वाजता मुंबईला जाण्याबाबतचा आणि पुढील दिशा स्पष्ट करण्याचा निर्णय घेईन, असे सांगितले.




शासनमान्य • पेस्ट कंट्रोल
झुरळ, ढेकुण, मुंग्या, उंदिर, कोळी, वाळवी, पाली व मच्छर साठी
7276423997 | 9272424705 फॉगींग करून मिळेल.













पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे. आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

दर्जेदार व माफक दरात फ्लेक्स प्रिंटींग संपर्क : 9403232323

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शेतातील पाण्याच्या वादातून कोयत्याने वार करत मारहाण; ५ जणांवर गुन्हा दाखल

नगर - शेतातील पिकांना पाणी भरण्यासाठी सुरू केलेल्या पाईपलाईनचा कॉक काढल्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका शेतकऱ्यावर कोयत्याने वार करून बेदम मारहाण केल्याची घटना जेऊरजवळील ससेवाडी येथे घडली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात एकाच कुटुंबातील पाच जणांविरुद्ध गंभीर दुखापत आणि मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संभाजी भानुदास ससे (वय ५५, रा. सिटीझन कॉलनी, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे पत्नीसह ससेवाडी येथील शेतात पिकांना पाणी भरण्यासाठी गेले होते. मोटार चालू करूनही शेतात पाणी येत नसल्याने त्यांनी पाहिले असता पाईपलाईनचा कॉक काढलेला दिसला. संभाजी ससे यांनी नातू निखिल प्रकाश झरेकर (रा. डोंगरगण) याला कॉक जोडून देण्यास सांगितले. यावर निखिल याने वाद घातला. त्यानंतर संभाजी यांचा भाऊ आदिनाथ भानुदास ससे, पुतण्या दत्तप्रसाद आदिनाथ ससे, उषा आदिनाथ ससे (सर्व रा. ससेवाडी, जेऊर) आणि दिव्या स्वप्नील शिंदे (रा. मिरी माका, पाथर्डी) हे त्या ठिकाणी आले. त्यावेळी दत्तप्रसाद ससे याने अश्लील शिवीगाळ करत जवळच पडलेला कोयता उचलून संभाजी ससे यांच्या कपाळावर मारला. तसेच आदिनाथ व दत्तप्रसाद यांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. यावेळी भांडण सोडवण्यासाठी मध्ये आलेल्या त्यांच्या नातेवाईक महिलेलाही निखिल, उषा आणि दिव्या यांनी मारहाण केली. या हल्ल्यात संभाजी ससे जखमी झाले असून, त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी निखिल झरेकर, आदिनाथ ससे, दत्तप्रसाद ससे, उषा ससे आणि दिव्या शिंदे या पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

# निवृत्तीचं स्वातंत्र्य, पुढे काय


राजन कुटे

गेल्या वर्षभराच्या लिखाणातून अनेक वाचकांकडून सातत्याने अशी मागणी होत होती की, निवृत्ती आणि त्यानंतरच्या आयुष्याबद्दलही लिहावं. कदाचित म्हणूनच हा विषय पुन्हा पुन्हा मनात येत राहिला.

एकदा पुरेसा पैसा जमला की, मग निवांत जगता येईल. आपल्या मनात कधीतरी हा विचार आलेला असतो. चांगली नोकरी, वाढतं उत्पन्न, घर, मुलांचं शिक्षण आणि त्याचबरोबर हळूहळू तयार होत जाणारी गंगाजळी-या सगळ्यामागे एक दिवस कामाची सक्ती संपवून आपल्या मनाप्रमाणे जगता यावं, हे स्वप्न असतं. याच विचारातून Early Retirement किंवा FIRE सारख्या संकल्पना लोकप्रिय झाल्या. लवकर आर्थिक स्वातंत्र्य मिळवायचं आणि मग आयुष्य आपल्या पद्धतीने जगायचं. कल्पना आकर्षक आहे, पण एक प्रश्न आपण फार कमी वेळा विचारतो-निवृत्तीनंतर पुढे काय?

निवृत्तीपर्यंतचा आर्थिक प्रवास तुलनेने स्पष्ट असतो. उत्पन्न कमवायचं, खर्च सांभाळायचा, बचत करायची, गुंतवणूक करायची आणि गंगाजळी तयार करायची. प्रत्येक निर्णयाला एक दिशा असते. मात्र निवृत्तीच्या टप्प्यावर भूमिका बदलते. आता नवीन पैसा कमावण्यापेक्षा आतापर्यंत तयार केलेल्या पैशातून पुढचं आयुष्य जगायचं असतं. म्हणूनच माझ्याकडे किती पैसा असावा? या प्रश्नाबरोबरच हा पैसा मला किती काळ आणि कशासाठी पुरायला हवा? हा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो.

इथे retirement planning केवळ आकड्यांचं गणित राहत नाही. महागाई, आरोग्याशी संबंधित अनपेक्षित खर्च, आयुष्य किती वर्षे पुढे असेल याची अनिश्चितता या सगळ्यांचा विचार करावा लागतो. पण त्याहूनही एक वेगळा पैलू आहे. आज गंगाजळी तयार करणारा आपण आणि काही दशकांनी ती गंगाजळी सांभाळणारा आपण अगदी तसा असेलच, असं नाही. आज आपण एखादा मोठा portfolio सहज समजून घेतो. अनेक योजना, वेगवेगळी उद्दिष्टं, वेळोवेळी review (पुनरावलोकन), allocation (मालमत्ता वाटप) मध्ये बदल हे सगळं आपल्याला व्यवस्थित जमतं. पण वय वाढत गेल्यावर प्रत्येक निर्णय तितक्याच सहजतेने घेता येईल का? कदाचित म्हणूनच निवृत्तीचं नियोजन करताना केवळ चांगली गुंतवणूक निवडणं पुरेसं नाही; ती गुंतवणूक पुढेही समजण्यास, सांभाळण्यास आणि योग्य वेळी वापरण्यास सोपी राहील का, याचाही विचार करायला हवा.

साधेपणा हा अनेकदा कमीपणाचा किंवा संधी गमावण्याचा (FOMO) पर्याय मानला जातो. इथे निवृत्तीच्या नियोजनात मात्र कदाचित शहाणपणाचा भाग असू शकतो. स्पष्ट asset allocation, प्रत्येक गुंतवणुकीमागचा उद्देश आणि अनावश्यक गुंतागुंत टाळणं-यामुळे उद्याच्या आपल्याला कमी निर्णय घ्यावे लागतात. आणि काही गोष्टी आजच व्यवस्थित ठरवून ठेवल्या, तर उद्या प्रत्येक निर्णय नव्याने घेण्याची गरजही कमी होते.

याच संदर्भात आणखी एक गोष्ट महत्त्वाची वाटते-आपण आपल्या मालमत्तेची कागदपत्रं जपून ठेवतो, nomination करतो, Will करतो. हे सगळं आवश्यक आहे. पण त्यातून एक वेगळा प्रश्न सुटत नाही. आपण जिवंत असताना आपला पैसा कसा सांभाळला जावा, याची कल्पना आपल्या जवळच्या माणसांना आहे का?

कारण nomination आणि Will हे मालमत्ता कोणाकडे जाईल याबद्दल स्पष्टता देतात; पण उद्या एखादा मोठा आर्थिक निर्णय घ्यायचा असेल, तेव्हा काय करायचं, कोणाचा सल्ला घ्यायचा, गुंतवणुकीची रचना का केली होती, हे कुठेतरी स्पष्ट असणंही महत्त्वाचं आहे.

आज आपण एखादा निर्णय का घेतला, हे आपल्याला अगदी स्वाभाविक वाटतं. पण काही वर्षांनी तोच संदर्भ विसरला जाऊ शकतो. म्हणूनच आज घेतलेल्या महत्त्वाच्या आर्थिक निर्णयांमागचा विचारही नोंदवून ठेवणं ही एक प्रकारची भविष्यातील स्वतःसाठीची तयारी असायला हवी.

इथे Baghban आठवतो ? त्या चित्रपटाची कथा केवळ मुलं आणि आई-वडिलांच्या नात्याची नव्हती. तिच्यामध्ये एक अस्वस्थ करणारा प्रश्नही होता-वय वाढल्यानंतर आपली आर्थिक गरज आणि आपली आर्थिक स्वायत्तता यांचं काय? मुलं आपल्यासाठी उभी राहतील, यावर विश्वास ठेवणं चुकीचं नाही. पण त्या विश्वासाची गरज पडू नये, अशी आर्थिक तयारी करणं कदाचित त्याहून चांगलं. याचा अर्थ पुढच्या पिढीवर अविश्वास नाही. उलट, आपल्या आयुष्याची आर्थिक जबाबदारी शक्य तितकी स्वतःकडे ठेवणं ही पुढच्या पिढीवरील प्रेमाचीही एक पद्धत असू शकते. कारण पैसा फक्त खर्च भागवण्यासाठी नसतो. तो आपल्याला निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य देतो-कुठे राहायचं, कशासाठी खर्च करायचा, कोणाला मदत करायची आणि आपल्या वेळेचा उपयोग कसा करायचा.

म्हणून आर्थिक स्वातंत्र्याचा अर्थ फक्त आता मला काम करण्याची गरज नाही असा नसावा. त्याचा अर्थ कदाचित असा असावा की काम करायचं की नाही, हा निर्णय माझा असावा. आणि म्हणूनच निवृत्तीचं नियोजन करताना माझी गंगाजळी किती असावी? हा प्रश्न महत्त्वाचा असला, तरी तो एकटाच पुरेसा नाही. त्यासोबत विचारायला हवं-ही गंगाजळी माझ्या पुढच्या आयुष्याच्या गरजा पूर्ण करेल का? ती मला माझ्या निवडीचं स्वातंत्र्य देईल का? आणि आज मी तयार केलेली आर्थिक व्यवस्था उद्याचा मी सहजपणे सांभाळू शकेल का?

निवृत्ती म्हणजे कमाईचा शेवट नाही; ती पैशाच्या भूमिके मधला बदल आहे. आज पैसा आपल्याला भविष्यासाठी तयार करतो. उद्या तोच पैसा आपलं वर्तमान घडवणार असतो. म्हणून निवृत्तीची तयारी म्हणजे फक्त पुरेशी गंगाजळी तयार करणं नाही; ती गंगाजळी पुढची अनेक वर्षे आपल्याला स्वावलंबी, शांत आणि सन्मानाने जगता यावी, याची तयारी करणं सुद्धा आहे. कदाचित म्हणूनच निवृत्तीपूर्वी स्वतःला विचारण्याचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा नसावा-

मी किती कमावलं? तर, मी तयार केलेल्या पैशामुळे मला पुढचं आयुष्य किती स्वातंत्र्याने जगता येईल? हा असावा.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

- **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत म्युच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# नगर जवळील एका शेतात महिलेने केली होती गांजाच्या झाडांची लागवड

## पोलिसांनी छापा टाकत ३ लाख १६ हजारांचा गांजा केला जप्त, महिलेवर गुन्हा दाखल


नागरदेवळे शिवारात ३ लाख १६ हजारांचा गांजा पकडल्यानंतर मुद्देमालासह भिंगार कॅम्प पोलीसांचे पथक.

नगर - नगर शहराजवळील नागरदेवळे गावच्या शिवारात बेकायदेशीरपणे गांजाची झाडे लावून त्याची लागवड व निर्मिती करणाऱ्या एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या कारवाईत ३ लाख १६ हजार ३०० रुपये किमतीची ३१ किलो ६३ ग्रॅम वजनाची उग्र वासाची गांजाची झाडे जप्त केली आहेत.

२८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास नागरदेवळे गावच्या शिवारातील अमरधाम लगत असलेल्या शेत गट नंबर ११७ मध्ये ही कारवाई करण्यात आली. नागरदेवळे गावच्या शिवारात शेतात गाजांची लागवड करण्यात आली असल्याची माहिती भिंगार कॅम्पच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांना मिळाली होती. ही माहिती मिळताच त्यांनी रात्री ८.३० च्या सुमारास पोलीस पथकासह जावून तेथे पाहणी केली असता गांजाची झाडे आढळून आली. बुऱ्हाणनगर येथील एका महिलेने शासनाची कोणतीही परवानगी न घेता स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीरपणे गांजा या अंमली पदार्थाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने गांजाच्या झाडांची लागवड करून त्याचे उत्पन्न घेतल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद मधुकर लहारे यांच्या फिर्यादीवरून संशयित महिलेविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २० (अ) (ब) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि. तेजश्री थोरात करीत आहेत.

# पुणे येथे ३१ ऑगस्टला राज्यस्तरीय भटके विमुक्त परिषद

नगर - भटके विमुक्त संयोजन समिती व भैरव क्रांती सेना महाराष्ट्र राज्य च्या वतीने ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत साने गुरुजी स्मारक सभागृह, दांडेकर पूल, पुणे येथे राज्यस्तरीय भटके विमुक्त परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अॅड. डॉ. अरुण जाधव यांनी दिली.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके व महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) चे प्रदेशाध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास प्रसिद्ध लेखक उचल्याकार लक्ष्मण गायकवाड, भटक्या विमुक्त समाजातील कार्यकर्त्या शैला यादव, भराडी समाजाच्या नेत्या सुमन सातपुते, मरीआईवाले समाजाच्या नेत्या संगीता निंबाळकर आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. भटके विमुक्त समाजाचे नेते विजय जाधव हे स्वागताध्यक्ष आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील भटक्या विमुक्त समाजातील कार्यकर्ते संतोष चव्हाण, तुकाराम पवार, विशाल पवार, ऋषिकेश गायकवाड, अजित भोसले, राजश्री लष्करे, ललिता पवार, सलीम मदारी, दया चव्हाण, अशोक शिंदे, मोहन चव्हाण, पुणे जिल्ह्यातील संग्राम माळवे, प्रकाश सावंत, दीपक पकाले, शंकर जाधव, दादा शिंदे, सुरेश शेगर, सुभाष सावंत, अतिश नाकोडे, तानाजी चौगुले, बाबासाहेब चव्हाण, अॅड. गोविंद राठोड, गोविंद अटक, पुरुषोत्तम पवार, चेतन शिंदे हे या परिषदेचे संयोजन समिती सदस्य आहेत.

यावेळी अॅड. डॉ. अरुण हिराबाई जाधव लिखित 'विमुक्तांची पंचाहत्तरी' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमास राज्यभरातील भटके, विमुक्त, जाती, जमाती मधील प्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन उमाताई जाधव, बापू ओहोळ, राकेश साळुंखे व सचिन भिंगारदिवे यांनी केले आहे.


राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा सत्कार करताना श्रीमती पार्वतीबाई जगताप. समवेत आ.संग्राम जगताप, डॉ.वंदना फाटके, शीतल जगताप व अनुराधा नागवडे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली आ.जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

नगर - राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार नगर जिल्हा दौऱ्यावर आल्या असता गुरुवारी सायंकाळी त्यांनी आ.संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. आ.संग्राम जगताप व मार्केट कमिटीचे माजी सदस्य संतोष सूर्यवंशी यांनी त्यांचे स्वागत केले. तसेच श्रीमती पार्वतीबाई जगताप, डॉ.वंदना फाटके, शीतल जगताप व अनुराधा नागवडे यांनी श्रीमती पवार यांचा सत्कार केला.

यावेळी वंशिका फाटके, परमेश्वरी जगताप, संघशीला जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, राजेंद्र चोपडा, योगेश दाणी, चेतन अग्रवाल, हर्शल अग्रवाल आदी उपस्थित होते.

# नगर शहरात पाव-लादी महागणार, १ सप्टेंबरपासून नवे दर लागू होणार

## कच्च्या मालाच्या महागाईमुळे बेकरी व्यवसायिकांचा बैठकीत दरवाढीचा निर्णय


शहरात पाव लादीचे दर वाढविण्याचा निर्णय बैठकीत जाहीर करताना बेकरी व्यावसायिक.

नगर - वाढत्या महागाईमुळे पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ झाली असून वाहतूक खर्च वाढला आहे. तसेच बेकरी व्यवसायाला लागणारा कच्चा माल तेल, साखर, मैदा यांचे दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. त्यामुळे शहरातील बेकरी व्यवसाय संकटात आला असून दरवाढ करणे आवश्यक असल्याचे बेकरी असोसिएशनच्या वतीने सांगण्यात आले.

शहरातील बेकरी व्यावसायिकांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पाव लादीचे दर ४० रुपये करण्याचा निर्णय बेकरी असोसिएशनने घेतला आहे. ही दरवाढ येत्या १ सप्टेंबरपासून लागू होणार आहे. यावेळी स्वराज बेकरीचे संचालक सलीम अन्सारी म्हणाले, गेल्या चार वर्षांपासून बेकरी उत्पादनांचे दर कायम आहेत. परंतु महागाईचा भडका मोठ्या प्रमाणात वाढल्याने साखर, तेल, मैदा यांचे दर वाढले आहेत. उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात होत असल्याने बेकरी व्यावसायिक संकटात आले आहेत. शहरातील बेकरी व्यावसायिकांनी एकत्र येऊन दरवाढ करण्याचे ठरवले आहे. उत्पादन खर्चातील वाढ लक्षात घेऊन पाव लादी होलसेल ४० रुपये आणि रिटेलसाठी ५० रुपये दराने ग्राहकांसाठी उपलब्ध केली जाणार आहे.

जेके बेकरीचे संचालक पारितोष शिंदे म्हणाले, बेकरी उत्पादनांची दरवाढ नाशिक, पुणे, बारामती अशा शहरांमध्ये यापूर्वीच करण्यात आली असून नगर शहरातही १ सप्टेंबरपासून ही दरवाढ लागू करण्यात येत आहे. याची सर्व ग्राहकांनी नोंद घ्यावी.

या बैठकीस स्वराज बेकरीचे सलीम अन्सारी, जेके बेकरीचे पारितोष शिंदे, सहारा बेकरीचे सलमान मलिक, फैजा बेकरीचे सादाब शेख, फाईव्ह स्टार बेकरीचे अन्सार अन्सारी, मिलन बेकरीचे सलीम शेख, फैसल शेख, जिशान अन्सारी, सादाब अन्सारी, मुमताज शेख आदी बेकरी व्यावसायिक उपस्थित होते.

# रोहिदास इथापे यांचे दु:खद निधन



नगर - केडगाव, वैष्णवनगर येथील रहिवासी रोहिदास बबन इथापे (वय ७६) यांचे २७ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रकाश इथापे यांचे ते वडील होत.

# बबन भाऊसाहेब लोंढे यांचे निधन



नगर - केडगाव येथील प्रगतशील शेतकरी, जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त कर्मचारी बबन भाऊसाहेब लोंढे (वय ७४) यांचे अल्पशा आजाराने २७ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्यामागे पत्नी, दोन मुले, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चित्रकला शिक्षक शशिकांत लोंढे, कृषी सहाय्यक सारिका लोंढे यांचे ते वडील होत.

# हिरालाल आडेप यांचे अल्प आजाराने निधन



नगर - मोहनबाग, तोफखाना येथील रहिवासी हिरालाल रामचंद्र आडेप (वय ८३) यांचे २९ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ५ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अभिजित व रविंद्र आडेप यांचे ते वडील होत.

# भिंगारमध्ये तरुणाला जीवे मारण्याची धमकी

नगर - पत्नीला मेसेज पाठवण्याबाबत जाब विचारल्याच्या कारणावरून एका तरुणाला दमदाटी करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना भिंगार परिसरात घडली आहे. या प्रकरणी संबंधित तरुणाच्या तक्रारीवरून संशयिताविरुद्ध भिंगार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सतीश उर्फ नाना ज्ञानेश्वर मोरे (रा. सौरभनगर, भिंगार) असे गुन्हा दाखल झालेल्या इसमाचे नाव आहे. संबंधित तरुणाने सतीशला, तू माझ्या पत्नीला सतत मोबाईलवर मेसेज का करतोस? अशी विचारणा केली. या गोष्टीचा राग आल्याने सतीश मोरे याने त्या तरुणाला सर्वांसमोर शिवीगाळ व दमदाटी करत थेट जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर संबंधित तरुणाने तात्काळ भिंगार पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी सतीश उर्फ नाना ज्ञानेश्वर मोरे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# वकिलाची गोळ्या घालून हत्या करणाऱ्या सात जणांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा

## १३ वर्षानंतर जिल्हा न्यायालयाचा निकाल, पुराव्या अभावी ५ जण निर्दोष

नगर - नेवासा येथील अॅड. रियाज पठाण खून खटल्यात प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कचरे यांनी सात आरोपींना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तर पुराव्याअभावी ५ आरोपींची निर्दोष मुक्तता केली. १६ सप्टेंबर २०१३ रोजी नेवासा तहसीलच्या आवारात अॅड. पठाण यांची गोळ्या झाडून हत्या केली होती. १३ वर्षानंतर या खटल्याचा निकाल आला. खटल्यात सरकार पक्षातर्फे बाजू मांडणाऱ्या विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी ही माहिती दिली.

सन २०१२ मध्ये औरंगाबाद न्यायालयातील अण्णा लष्करे खून प्रकरणात अॅड. पठाण यांनी साक्ष दिली होती. यात त्यांना फितूर घोषित केले होते. मात्र, वृत्तपत्रातील बातमी वाचून अॅड. पठाण हे फिर्यादीच्या बाजूने बोलले, असा अण्णा लष्करे गँगचा असा गैरसमज झाला. याच रागातून पुण्यातील तुरुंगात असलेल्या सोपान गाढे व त्याच्या साथीदारांनी पठाण यांच्या हत्येचा कट रचला.

१६ सप्टेंबर २०१३ रोजी दुपारी पावणेतीन ते तीनच्या सुमारास अॅड. रियाज पठाण हे नेवासा येथील तहसील कार्यालय, पोलीस ठाणे व नोंदणी उपनिबंधक कार्यालयाच्या आवारात एका लिंबाच्या झाडाखाली दस्त नोंदणीचे काम करत बसले होते. त्यावेळी आरोपींनी त्यांच्यावर पाळत ठेवली होती. आरोपी प्रवीण खरचंद याने पाठीमागून येऊन अॅड. पठाण यांच्यावर पिस्तुलातून तीन गोळ्या झाडल्या. त्याच्या इतर तीन सहकाऱ्यांनी पठाण यांचे दोन्ही हात घट्ट धरून ठेवले होते, तर उर्वरित आरोपी त्यांना गोळ्या झाडण्यासाठी चिथावणी देत होते. या घटनेनंतर पठाण रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. उपस्थित प्रत्यक्षदर्शी असिफ शेख व इतरांनी त्यांना रुग्णालयात हलवले, मात्र डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. दरम्यान, घटनेनंतर पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या मुख्य आरोपी प्रवीण खरचंद याला नेवासा पोलिसांनी घटनास्थळीच पिस्तुलासह रंगेहात पकडले होते.

असिफ पठाण यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गाजलेल्या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण २९ साक्षीदार, तर बचाव पक्षातर्फे ३ साक्षीदार तपासण्यात आले. विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी मांडलेला भक्कम युक्तिवाद आणि प्रत्यक्षदर्शींच्या साक्षीच्या आधारे न्यायालयाने ७ आरोपींना दोषी ठरवत मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारी पक्षाला वकील परिमल फळे आणि पैरवी अधिकारी तथा पोलीस हवालदार महेश जोशी यांनी सहकार्य केले.

जन्मठेप झालेले आरोपी - प्रवीण पोपट खरचंद, मोहन सुरेश लष्करे (फरार), रामेश्वर भगवान गाढे, चौरंगीनाथ गोरक्षनाथ लष्करे, पवन सोमनाथ नरुल्ला, सचिन चंदू चव्हाण, सादिक बशीर शेख. निर्दोष सुटका झालेले - अशोक जालिंदर जगताप, सत्यवान धनराज सोनकांबळे उर्फ लष्करे, विलास पोपट जिरे, सोपान भगवान गाढे, सुनील मोहन परदेशी.

# शेतातील पाईपलाईनच्या वादातून तरुणाच्या डोक्यात घातला दगड; दोघांवर गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील ससेवाडी येथे सामाईक पाईपलाईनच्या कारणावरून झालेल्या वादातून तरुणाच्या डोक्यात दगड मारून त्याला जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ससेवाडी येथील रहिवासी दत्तप्रसाद आदिनाथ ससे (वय २४) हे २७ ऑगस्ट रोजी दुपारी आपल्या आई-वडिलांसोबत घरात होते. त्यावेळी गावातीलच संभाजी भानुदास ससे आणि जनाबाई संभाजी ससे हे त्यांच्या घरासमोर आले. 'तुम्ही सामाईक पाईपलाईनचे बारे तोडले आहेत, ते नीट करून द्या,' असे म्हणत त्यांनी जाब विचारण्यास सुरुवात केली. यावर फिर्यादीच्या आईने आम्ही पाईपलाईनचे काहीही नुकसान केले नाही असे सांगितले. याचा राग आल्याने आरोपींनी फिर्यादीच्या आईला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. दत्तप्रसाद ससे यांनी मध्यस्थी करत शिवीगाळ करू नका असे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

याचा अधिकच राग आल्याने संभाजी भानुदास ससे यांनी हातातील दगडाने थेट दत्तप्रसाद यांच्या डोक्यात जोरदार प्रहार केला. यामध्ये दत्तप्रसाद हे गंभीर जखमी झाले. मारहाण केल्यानंतर जाताना दोघांनी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची उघड धमकी दिली. जखमी दत्तप्रसाद ससे यांच्यावर अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. यानंतर त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. पोलिसांनी संभाजी ससे व जनाबाई ससे या दोघांवर गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पोलीस हवालदार खामकर करत आहेत.

# संरचनात्मक स्थिरता : सुरक्षित विकासाचा अदृश्य पण सर्वात महत्त्वाचा पाया







## वाढत्या शहरीकरणाच्या युगात सुरक्षित बांधकामाची नवी जबाबदारी

**इमारत किती सुंदर आहे? पेक्षा इमारत किती सुरक्षित आहे? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा!**

आज आपण ज्या काळात जगत आहोत, त्या काळात शहरांची उंची दिवसेंदिवस वाढत आहे. नवीन निवासी टॉवर्स, व्यापारी संकुले, शाळा, रुग्णालये, औद्योगिक प्रकल्प, उड्डाणपूल आणि आधुनिक पायाभूत सुविधा देशाच्या विकासाचे प्रतीक बनत आहेत. एखाद्या इमारतीकडे पाहताना आपले लक्ष तिच्या आकर्षक दर्शनी भागाकडे, आधुनिक वास्तुरचनेकडे किंवा आलिशान सुविधांकडे जाते. पण त्या भव्य इमारतीचा खरा आधार दिसत नाही– तो म्हणजे तिची संरचनात्मक स्थिरता (Structural Stability).

इमारतीचे सौंदर्य लोकांना आकर्षित करू शकते, परंतु तिची सुरक्षितता लोकांचा विश्वास जिंकते. एखादी इमारत किती महाग आहे, किती आधुनिक आहे किंवा किती उंच आहे, यापेक्षा ती पुढील अनेक दशकांपर्यंत सुरक्षित राहणार आहे का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कारण कोणत्याही संरचनेचे अंतिम मूल्य तिच्या टिकाऊपणात आणि सुरक्षिततेत असते.

**संरचनात्मक स्थिरता म्हणजे नेमके काय?**

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, संरचनात्मक स्थिरता (Structural Stability) म्हणजे कोणत्याही इमारतीने किंवा संरचनेने तिच्यावर कार्य करणारे सर्व प्रकारचे भार सुरक्षितपणे पेलून, स्वीकारार्ह मर्यादेतील (Permissible Limits) विकृती राखत, कोणतेही संरचनात्मक अपयश (Structural Failure), अतिवाकणे (Excessive Deflection), तडे (Cracking) किंवा कोसळण्याचा धोका निर्माण न होऊ देता संपूर्ण अपेक्षित सेवा आयुष्य (Service Life) कार्यक्षम आणि सुरक्षितपणे पूर्ण करण्याची क्षमता होय.

या भारांमध्ये संरचनेचे स्वतःचे वजन (Dead Load), वापरामुळे निर्माण होणारे भार (Live Load), वाऱ्याचा दाब (Wind Load), भूकंपामुळे निर्माण होणारे जडत्वीय बल (Earthquake Load), पाण्याच्या टाक्या, यंत्रसामग्री, वाहनतळ तसेच तापमानातील बदलांमुळे निर्माण होणारे ताण (Thermal Effects) यांचा समावेश होतो. संरचनेचे विश्लेषण करताना या सर्व भारांचे स्वतंत्र तसेच विविध Load Combinations मध्ये मूल्यांकन केले जाते. ही क्षमता योगायोगाने निर्माण होत नाही. ती अचूक संरचनात्मक विश्लेषण (Structural Analysis), वैज्ञानिक डिझाइन पद्धती, अनुभवी संरचनात्मक अभियंत्याचा अभियांत्रिकी निर्णय (Engineering Judgment), दर्जेदार साहित्य, गुणवत्तापूर्ण बांधकाम, योग्य डिटेलिंग (Detailing) आणि भारतीय मानक संहितांचे (IS Codes) काटेकोर पालन यांचा एकत्रित परिणाम असतो. त्यामुळे कोणत्याही संरचनेची सुरक्षितता ही केवळ वापरलेल्या स्टील किंवा काँक्रीटच्या प्रमाणावर अवलंबून नसून, तिच्या योग्य डिझाइन, भारवहन प्रणाली (Load Path) आणि गुणवत्तापूर्ण अंमलबजावणीवर अवलंबून असते.

**विकास जितका वेगवान, तितकी सुरक्षिततेची जबाबदारी मोठी**

गेल्या काही वर्षांत भारतातील बांधकाम क्षेत्राने अभूतपूर्व प्रगती केली आहे. लहान शहरांमध्येही बहुमजली इमारती उभ्या राहत आहेत. स्मार्ट सिटी, मेट्रो प्रकल्प, औद्योगिक कॉरिडॉर आणि आधुनिक गृहनिर्माण योजना देशाचा चेहरा बदलत आहेत. मात्र प्रत्येक नव्या इमारतीसोबत एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो–

ही इमारत पुढील ५० वर्षे सुरक्षित राहील का?

या प्रश्नाचे उत्तर केवळ सुंदर आराखड्यात नसते; ते योग्य संरचनात्मक डिझाइनमध्ये असते.

**सौंदर्य आणि सुरक्षितता यांतील फरक समजून घेऊ या**

वास्तुविशारद (Architect) इमारतीला सौंदर्य, उपयोगिता आणि आकर्षक स्वरूप देतो. परंतु त्या सौंदर्याला सुरक्षिततेचा मजबूत पाया देण्याचे कार्य संरचनात्मक अभियंता (Structural Engineer) करतो.

१. कॉलम किती मोठा असावा?
२. बीम किती मजबूत असावी?
३. पाया किती खोल असावा?
४. भूकंपाच्या वेळी इमारत कशी वागेल?
५. वादळी वाऱ्यांचा परिणाम किती होईल?

या सर्व प्रश्नांची उत्तरे गणित, विश्लेषण आणि अभियांत्रिकीच्या माध्यमातून शोधली जातात.

म्हणूनच प्रत्येक सुंदर इमारतीमागे एक सक्षम संरचनात्मक डिझाइन असणे अत्यावश्यक असते.

**समाजातील एक मोठा गैरसमज**

आजही अनेकांना वाटते की जास्त स्टील आणि जास्त सिमेंट म्हणजे जास्त मजबूत इमारत. हा समज पूर्णपणे योग्य नाही.संरचनात्मक अभियांत्रिकीमध्ये योग्य प्रमाण, योग्य डिटेलिंग आणि योग्य भारवाटप यांना अधिक महत्त्व असते. आवश्यकतेपेक्षा जास्त साहित्य वापरणेही तितकेच चुकीचे ठरू शकते. सुरक्षित इमारत जास्त खर्चामुळे तयार होत नाही; ती योग्य अभियांत्रिकीमुळे तयार होते.

**आजची सर्वात मोठी गरज – सुरक्षित बांधकामाची संस्कृती**

आज सुरक्षित बांधकाम ही केवळ अभियंत्यांची जबाबदारी राहिलेली नाही. घरमालक, बिल्डर, ठेकेदार, वास्तुविशारद, स्थानिक प्रशासन आणि प्रत्येक नागरिकाने सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

घर बांधताना आपण टाइल्सचा रंग, स्वयंपाकघराची रचना किंवा इंटिरियरवर चर्चा करतो; पण पाया, बीम, कॉलम किंवा माती परीक्षण याकडे अपेक्षेइतके लक्ष दिले जात नाही. प्रत्यक्षात याच अदृश्य घटकांवर संपूर्ण इमारतीचे आयुष्य अवलंबून असते.

**इमारतीचा सर्वात महत्त्वाचा भाग कोणता?**

हा प्रश्न विचारला तर अनेक जण कॉलम, बीम किंवा स्लॅब असे उत्तर देतील. परंतु संरचनात्मक अभियंत्याच्या दृष्टीने इमारतीचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजेपाया (Foundation). कारण संपूर्ण इमारतीचा भार शेवटी जमिनीवरच हस्तांतरित होतो.

मजबूत इमारत उभारण्यासाठी फक्त चांगले काँक्रीट किंवा जास्त स्टील पुरेसे नसते. ज्या जमिनीवर इमारत उभी राहणार आहे, ती जमीन तो भार सुरक्षितपणे पेलू शकते का, हे जाणून घेणे अधिक महत्त्वाचे असते. म्हणूनच कोणत्याही प्रकल्पाची सुरुवात Soil Investigation (मृदा परीक्षण) पासून व्हायला हवी.

**माती परीक्षण (Soil Investigation) का आवश्यक आहे?**

एखाद्या व्यक्तीची आरोग्य तपासणी केल्याशिवाय मोठी शस्त्रक्रिया केली जात नाही. त्याचप्रमाणे जमिनीची तपासणी न करता इमारतीचा पाया निश्चित करणे हे अभियांत्रिकीच्या दृष्टीने योग्य नाही.

Soil Investigation मधून पुढील महत्त्वाची माहिती मिळते.

- ✻ जमिनीची Safe Bearing Capacity (SBC)
- ✻ मातीचा प्रकार
- ✻ भूजलाची पातळी
- ✻ संभाव्य Settlement
- ✻ जमिनीतील कमकुवत थर

या माहितीच्या आधारे संरचनात्मक अभियंता योग्य प्रकारचा पाया निवडतो.

**कमकुवत पाया म्हणजे भविष्यातील धोका**

पाया योग्य नसल्यास पुढील समस्या उद्भवू शकतात.

- ✻ भिंतींना तडे जाणे
- ✻ फरशी उचलणे
- ✻ दारे–खिडक्या अडकणे
- ✻ Differential Settlement
- ✻ गंभीर परिस्थितीत संपूर्ण संरचनेची स्थिरता धोक्यात येणे

म्हणूनच पाया हा दिसत नसला तरी इमारतीचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे.

**भाराचा प्रवास (Load Path) समजून घ्या**

संरचनात्मक अभियांत्रिकीमध्ये एक मूलभूत तत्त्व आहे.

Slab - Beam - Column - Foundation - Soil

यालाच Load Path म्हणतात.

इमारतीवरील प्रत्येक भार या मार्गाने सुरक्षितपणे जमिनीपर्यंत पोहोचला पाहिजे. या साखळीत कोणत्याही घटकात कमतरता राहिली, तर संपूर्ण संरचनेवर परिणाम होऊ शकतो.




**भारांचे (Loads) योग्य विश्लेषण का महत्त्वाचे?**

इमारतीवर विविध प्रकारचे भार कार्यरत असतात.

१. Dead Load

इमारतीचे स्वतःचे वजन.

२. Live Load

माणसे, फर्निचर, वाहने आणि वापरामुळे निर्माण होणारा भार.

३. Wind Load

उंच इमारतींवर वाऱ्याचा परिणाम अत्यंत महत्त्वाचा असतो.

४. Earthquake Load

भूकंपाच्या वेळी निर्माण होणारी जडत्व बल (Inertia Forces) संरचनेवर परिणाम करतात.

यातील प्रत्येक भाराचा वैज्ञानिक विचार करूनच डिझाइन तयार केले जाते.

**भारतीय मानक संहिता (IS Codes) का आवश्यक आहेत?**

भारतीय मानक संस्था (BIS) ने सुरक्षित बांधकामासाठी विविध मानके निश्चित केली आहेत.

✻ **IS 456 : 2000 -** PLAIN AND REINFORCED CONCRETE - CODE OF PRCTICE (RCC Design)

✻ **IS 800 : 2007 -** GENERL CONSTRUCTION IN STEEL - CODE OF PRACTICE (Steel Structures)

**IS 875 (Part 1 Vo 5) -** Code of Practice for Design Loads (विविध प्रकारचे भार)

**IS 1893 (Part 1) : 2016 -** CRITERI FOR ERTHQUKE RESISTNT DESIGN OF STRUCTURES (भूकंपरोधक डिझाइन)

**IS 13920 : 2016 -** DUCTILE DETAILING OF REINFORCED CONCRETE STRUCTURES SU'BJECTED TO SEISMIC FORCES - CODE OF PRACTICE (Ductile Detailing)

ही मानके केवळ नियम नसून सुरक्षिततेची वैज्ञानिक चौकट आहेत. त्यांचे पालन केल्याने संरचनेची कार्यक्षमता आणि विश्वासार्हता वाढते.

**संरचनात्मक अपयशाची प्रमुख कारणे**

बहुतेक दुर्घटना एका कारणामुळे घडत नाहीत; अनेक त्रुटी एकत्र आल्यावर त्या घडतात.

मुख्य कारणे अशी आहेत.

- ✻ चुकीचे संरचनात्मक डिझाइन
- ✻ निकृष्ट दर्जाचे साहित्य
- ✻ बांधकामातील निष्काळजीपणा
- ✻ अनधिकृत बदल
- ✻ गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव
- ✻ वेळेवर देखभाल न करणे

या प्रत्येक बाबीकडे दुर्लक्ष केल्यास त्याचा परिणाम भविष्यात गंभीर स्वरूपात दिसू शकतो.

**घर बांधणाऱ्या प्रत्येकाने लक्षात ठेवाव्यात अशा ५ गोष्टी**

- ✻ माती परीक्षणाशिवाय पाया निश्चित करू नका.
- ✻ पात्र Structural Engineer कडूनच संरचनात्मक डिझाइन करून घ्या.
- ✻ मंजूर आराखड्यात मनमानी बदल टाळा.
- ✻ दर्जेदार साहित्य आणि योग्य क्युरिंग सुनिश्चित करा.
- ✻ प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता नियंत्रणाला प्राधान्य द्या.

**भूकंप इमारत पाडत नाही, कमकुवत डिझाइन पाडते!**

भूकंप झाल्यानंतर अनेकदा असा समज होतो की इमारती जमिनीच्या हालचालीमुळे कोसळतात. प्रत्यक्षात भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या जडत्व बलांचा (Inertia Forces) योग्य विचार डिझाइनमध्ये केला गेला नसेल, तरच इमारती गंभीरपणे बाधित होतात.

आधुनिक संरचनात्मक अभियांत्रिकीचे उद्दिष्ट भूकंप रोखणे नाही, तर भूकंपाच्या वेळी इमारतीला सुरक्षितपणे ऊर्जा शोषून घेण्यास सक्षम बनवणे आहे. यासाठी डक्टाइल डिटेलिंग (Ductile Detailing), योग्य भारवाटप, नियमित संरचना (Structural Regularity) आणि भारतीय मानकांनुसार डिझाइन अत्यंत आवश्यक आहे.

**Structural Audit – इमारतीचे आरोग्य तपासणीपत्र**

आपण स्वतःची नियमित आरोग्य तपासणी करतो, वाहनाची सर्व्हिस करतो; मग ज्या इमारतीत आपण राहतो किंवा काम करतो, तिच्या सुरक्षिततेची तपासणी का करू नये?

विशेषतः २५–३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींसाठी Structural Audit ही काळाची गरज आहे.

Structural Audit मधून पुढील बाबींची तपासणी केली जाते.

- ✻ कॉलम व बीममधील तडे
- ✻ गंजलेले Reinforcement
- ✻ काँक्रीटची झीज
- ✻ अतिरिक्त भारामुळे निर्माण झालेले परिणाम
- ✻ भविष्यातील दुरुस्ती किंवा मजबुतीकरणाची आवश्यकता

वेळेवर केलेले Structural Audit केवळ खर्च वाचवत नाही, तर अनेक संभाव्य दुर्घटनाही टाळू शकते.

**प्रत्येक नागरिकाने लक्षात ठेवाव्यात अशा १० सुवर्ण नियम**

- ✻ घर बांधण्यापूर्वी Soil Investigation करून घ्या.
- ✻ पात्र Structural Engineer कडूनच डिझाइन करून घ्या.
- ✻ मंजूर आराखड्यात अनधिकृत बदल करू नका.
- ✻ गुणवत्तापूर्ण स्टील व काँक्रीटचाच वापर करा.
- ✻ काँक्रीटचे योग्य Curing करा.
- ✻ कॉलम किंवा बीममध्ये मनमानी बदल करू नका.
- ✻ जुन्या इमारतींचे वेळोवेळी Structural udit करून घ्या.
- ✻ IS Codes चे पालन होत आहे याची खात्री करा.
- ✻ फक्त कमी खर्चाच्या आधारावर निर्णय घेऊ नका.
- ✻ सुरक्षिततेशी कधीही तडजोड करू नका.

**अभियंत्यांची नैतिक जबाबदारी**

संरचनात्मक अभियंत्याची सही ही केवळ एका आराखड्यावरची स्वाक्षरी नसते; ती अनेक कुटुंबांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असते. प्रत्येक डिझाइन, प्रत्येक गणना आणि प्रत्येक निर्णय हा भविष्यातील अनेक वर्षांच्या सुरक्षिततेशी संबंधित असतो. म्हणूनच अभियांत्रिकी व्यवसायात तांत्रिक ज्ञानाइतकीच प्रामाणिकता, पारदर्शकता आणि नैतिक मूल्ये आवश्यक असतात.

**सुरक्षित भारताची सुरुवात सुरक्षित इमारतींपासून**

भारत झपाट्याने विकसित होत आहे. आधुनिक महामार्ग, मेट्रो, विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे, गृहनिर्माण प्रकल्प आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा देशाच्या प्रगतीचे प्रतीक आहेत. परंतु या विकासाचा पाया सुरक्षित संरचनांवरच उभा राहिला पाहिजे.

सुरक्षित बांधकाम ही केवळ अभियंत्यांची जबाबदारी नाही; ती वास्तुविशारद, कंत्राटदार, विकासक, स्थानिक प्रशासन आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आज आपण इमारतीची किंमत विचारतो; आता तिचीसंरचनात्मक सुरक्षिततादेखील विचारण्याची वेळ आली आहे.

**निष्कर्ष**

संरचनात्मक स्थिरता हा केवळ अभियांत्रिकीचा विषय नाही; तो मानवी जीवनाशी, सामाजिक जबाबदारीशी आणि राष्ट्राच्या शाश्वत विकासाशी संबंधित आहे. भक्कम पाया, शास्त्रीय डिझाइन, गुणवत्तापूर्ण साहित्य, काटेकोर अंमलबजावणी आणि नियमित तपासणी यांचा समन्वय झाल्यासच सुरक्षित संरचना उभी राहते.

**लक्षात ठेवा –**

१. सुंदर इमारत डोळ्यांना आनंद देते; पण सुरक्षित इमारत आयुष्यभर विश्वास देते.

२. भिंती आणि छप्पर मिळून इमारत तयार होते; पण विज्ञान, गुणवत्ता, नैतिकता आणि जबाबदारी मिळून सुरक्षित इमारत घडते.

३. भक्कम पाया... विश्वासार्ह डिझाइन... सुरक्षित भविष्य.

४. भव्य इमारतींची खरी ओळख त्यांच्या उंचीत नसते; ती त्यांच्या सुरक्षिततेत असते. आणि सुरक्षिततेची सुरुवात होते संरचनात्मक स्थिरतेपासून.

५. इमारतीची उंची तिची ओळख ठरवते; पण तिचा पाया तिचे भविष्य ठरवतो.

**लेखक विषयी**

इंजी. संकेत विजय मुनोतहे B.E. (Civil) M.E. (Civil-Structure) पदवीधर संरचनात्मक अभियंता व सल्लागार असून सुरक्षित, शास्त्रीय आणि भारतीय मानकांनुसार (IS Codes) संरचनात्मक डिझाइन, स्ट्रक्चरल ऑडिट, आर. सी. सी. व स्टील स्ट्रक्चर डिझाइन, भूकंपरोधक विश्लेषण, पाया अभियांत्रिकी आणि विद्यमान संरचनांच्या मजबुतीकरणासाठी तांत्रिक सल्ला देतात.सुरक्षित बांधकामाविषयी समाजात जनजागृती व्हावी, प्रत्येक प्रकल्पात गुणवत्ता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य मिळावे आणि अभियांत्रिकीचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने ते सातत्याने लेखन व तांत्रिक मार्गदर्शन करतात.



**लेखक व संपर्क :**
**इंजी. संकेत विजय मुनोत**
B.E. (Civil) & M.E. (Civil-Structure)
Structural Engineer Consultant
कार्यालय
SANKET MUNOT STRUCTURL CONSULTNT
**पत्ता : गाळा नं –१, सावित्रीबाई फुले संकुल–२, नगररचना व मूल्यनिर्धारण विभागखाली, प्रोफेसर चौक, सावेडी, अहिल्यानगर, ४१४००३**
Mob. : +९१ ७३५०५०२७६५
Email : sanketmunot@12gmail.com

**आमच्या प्रमुख सेवा**

- ✻ RCC Structural Design
- ✻ Steel Structure Design
- ✻ Structural udit
- ✻ Industrial Shed Design
- ✻ Bungalow Building Design
- ✻ Earthquake Resistant Design
- ✻ Technical Consultancy
- ✻ Commercial Building Design
- ✻ Institutional, Hospital Building Design

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar



सेवानिवृत्तीनिमित्त लक्ष्मीकांत कुलकर्णी यांचा समर्थ शाळेत सपत्निक सत्कार करण्यात आला.

## ‘श्री समर्थ विद्यामंदिर’चे पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी सेवानिवृत्त

नगर – सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक लक्ष्मीकांत मधुकर कुलकर्णी हे ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. त्यामुळे सेवापूर्तीनिमित्त त्यांचा सपत्निक विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे उपस्थित होते.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका वसुधा जोशी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. किशोर देशपांडे यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये एल. एम. कुलकर्णी यांचे अनमोल योगदान असल्याचे सांगितले. कामावरील त्यांची निष्ठा आणि त्यांच्यातील विविध गुण–कौशल्यांचे कौतुक करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कुलकर्णी यांना संस्थेच्या वतीने मानपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. मानपत्राचे वाचन प्रशालेच्या शिक्षिका स्वप्ना कलवडे यांनी केले. श्री समर्थ विद्यामंदिर, सावेडी व सांगळे गल्ली येथील दोन्ही विभागांतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कुलकर्णी यांचा सत्कार केला. प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक राशीनकर, शास्त्री व बागुल यांनी कुलकर्णी यांच्या कार्याला उजाळा दिला.

प्रशालेचे माजी मुख्याध्यापक कासार, माजी शिक्षक बापूसाहेब गायकवाड, सातपुते, संगिता मालपाठक, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, मुख्याध्यापक सुनील कानडे, प्रा. अवचट यांनीही कुलकर्णी यांच्या कार्यपद्धतीचा गौरव केला. सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर यांनीही प्रशालेच्या वर्धिष्णू वाटचालीत कुलकर्णी यांचा असलेला सहभाग आणि त्यांची समर्पित सेवाभावी वृत्ती याबद्दल मत मांडले. कुलकर्णी यांच्या पत्नी शीतल कुलकर्णी यांनी आभार मानताना सरांनी कुटुंब आणि नोकरी या दोन्ही ठिकाणी योग्य न्याय दिला असल्याचे सांगितले. त्यांची कन्या धनश्री हिनेही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, चेअरमन विकास सोनटक्के, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य स्वप्निल कुलकर्णी, सुनील जोशी, तसेच सावेडी विभागातील प्रशालेच्या मुख्याध्यापिका वसुधा जोशी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन, तसेच माजी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वप्ना कलवडे यांनी केले.

आभार माधुरी मेलगर यांनी मानले.

## फिरोदिया विद्यालयात ‘हेड बॉय–हेड गर्ल’चे पदग्रहण




अशोकभाऊ फिरोदिया विद्यालयात ‘हेड बॉय–हेड गर्ल’चा पदग्रहण सोहळा प्रसंगी उपस्थित सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया व पदाधिकारी.

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी निवडण्यात आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधी (‘हेड बॉय’ व ‘हेड गर्ल’) यांचा पदग्रहण सोहळा पार पडला. विद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्यात नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींनी आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवून शिस्त, नेतृत्व आणि प्रामाणिकपणे कार्य करण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया होत्या. सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या सल्लागार समितीच्या सदस्या सुनीता मुथा यांच्यासह प्राचार्य प्रभाकर भाबड, उपप्राचार्य कविता सुरतवाला, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, प्राथमिक विभाग प्रमुख अर्चना मुंडीवाले, पूर्व–प्राथमिक विभाग प्रमुख ज्योती सुद्रिक यांची उपस्थिती होती.

विद्यालयाच्या संगीत शिक्षिका रेणुका पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. पाहुण्यांचा परिचय प्रिया भळगट यांनी करून दिला. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी हेड बॉय म्हणून संचित बारसे, हेडगर्ल समृद्धी नमन आणि असिस्टंट हेड बॉय अर्चित चोरबेले, असिस्टंट हेडगर्ल सई शेरकर यांची निवड करण्यात आली. विद्यार्थी प्रतिनिधींची निवड प्रक्रिया कोणत्या पद्धतीने पार पडली, याबाबत शिल्पा कमळकर यांनी उपस्थितांना माहिती दिली. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पदग्रहण सोहळ्यास प्रारंभ झाला. प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधीचे नाव पुकारून त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या पदाची व जबाबदारीची माहिती राशीनकर सर यांनी दिली.

विद्यालयाचे क्रीडाशिक्षक प्रीतम जाधव व दिशान गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींनी पदाची शपथ घेतली. विद्यार्थी प्रतिनिधींना संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा व खजिनदार प्रकाश गांधी यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनल शर्मा यांनी केले.

आभार अफसर शेख यांनी मानले. या कार्यक्रमात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.




# गुडघेदुखीकडे दुर्लक्ष नको



व्याधी विकार

डॉ. अमोल नाईकवाडे

चालणे, उठणे, बसणे, पायऱ्या चढणे, अशा प्रत्येक कामात गुडघे महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु वृद्धत्व आणि शारीरिक हालचालींच्या अभावामुळे कधीकधी गुडघ्यातील तेलकटपणा कमी होतो. त्यात असलेले नैसर्गिक स्नेहन हळूहळू कमी होऊ लागते. परिणामी गुडघ्यांमध्ये वेदना, कडकपणा आणि चालण्यात अडचण येते.

गुडघ्यातील तेलकटपणा कमी होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे कार्टिलेजची झीज होणे आणि सायनोव्हियल फ्लुइड कमी होणे. परंतु योग्य वेळी लक्ष दिल्यास गुडघ्यांचे आरोग्य चांगले राखता येते.

गुडघ्यांमधील वंगण कमी का होते?

* **वृद्धत्व:** वयाच्या चाळीशीनंतर शरीरातील नैसर्गिक स्नेहन कमी होऊ लागते. त्यामुळे सांध्यातील कोरडेपणा आणि वेदना वाढतात.
* **जास्त वजन आणि लठ्ठपणा:** शरीराचे अतिरिक्त वजन थेट गुडघ्यांवर परिणाम करते. त्यामुळे कूर्च्या लवकर झिजतात.
* **व्यायामाचा अभाव:** नियमित हालचालींच्या अभावामुळे गुडघ्यांना स्नेहन प्रदान करणारे सायनोव्हियल फ्लुइड कमी होते.
* **चुकीच्या खाण्याच्या सवयी:** कॅल्शियम, व्हिटॅमिन डी आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडचा अभाव हाडे आणि सांधे कमकुवत करतो.
* **दुखापत किंवा जुनी दुखापत:** गुडघ्यांमध्ये जुनी दुखापत किंवा संधिवाताची समस्येमुळे देखील स्नेहन कमी होऊ शकते.

**गुडघ्यातील स्नेहनाचे संरक्षण आणि वाढ करण्याचे मार्ग**

* ओमेगा-३ फॅटी ॲसिडचे सेवन
* मासे, अळशीच्या बिया, अक्रोड यांसारखे पदार्थ गुडघ्यांमध्ये स्नेहन राखण्यास मदत करतात.
* हलका व्यायाम करा
* चालणे, सायकलिंग आणि योगा यांसारखे हलके व्यायाम गुडघ्यांमध्ये द्रव परिसंचरण सुधारतात.

**वजन नियंत्रणात ठेवा**

* शरीराचे वजन नियंत्रणात ठेवल्याने गुडघ्यांवर कमी दबाव येतो.
* कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी घ्या.

# मिळवा रागावर नियंत्रण



मानसिक आरोग्य

रोजच्या आयुष्यात राग येणं अगदी स्वाभाविक आहे. पण रागावर नियंत्रण मिळवणंही तितकंच गरजेचं आहे. रागाचा परिणाम तुमच्या आरोग्यावरच नाही तर नातेसंबंधांवरही होतो. त्यामुळे रागाचं व्यवस्थापन करण्याच्या या टिप्स तुमच्या कामी येतील.

* तुम्हाला एका विशिष्ट परिस्थितीत राग येतो किंवा काही गोष्टी मनाप्रमाणे घडल्या नाहीत तर चिडचिड होते. मात्र उगाचच रागवण्यापेक्षा किंवा चिडचिड करत बसण्यापेक्षा समस्येवर उपाय शोधणं गरजेचं आहे. समस्या कितीही जटील असली तरी सुटू शकते. त्यामुळे समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करा.
* रागाच्या भरात आपण बरंच काही बोलून जातो. या शब्दांमुळे समोरची व्यक्ती दुखावली जाते आणि नात्यांवर परिणाम होतो. त्यामुळे राग आल्यावर फार बोलू नका. शांत व्हा. राग कमी झाल्यावर स्वत:च्या भावनांना वाट करून द्या. शांतपणे चर्चा करा. आपली समस्या, प्रश्न किंवा व्यथा शांतपणे मांडा.
* राग येण्यामागच्या कारणांचा शोध घ्या. विशिष्ट प्रसंगी किंवा ठराविक कारणांमुळे राग येत असेल तर त्यावर उपाय शोधा. उगाचच रागवू नका. यामुळे तुम्ही परिस्थिती योग्य पद्धतीने हाताळू शकाल. तसंच तुमच्या हातून कोणतीही चुकीची कृती घडणार नाही.
* राग आल्यावर कशा प्रकारे प्रतिक्रिया द्यायची हे ठरवा.

# पावसाळ्यात हिरड्यांच्या समस्यांमध्ये वाढ



आरोग्य मंत्र

पावसाळा सुरू झाला की, अनेकांना गरमागरम भजी, चहा, तिखट-चमचमीत पदार्थ, गोड पदार्थ आणि त्याचसोबतच कमी पाणी पिण्याची सवय लागते. आणि सतत हेच पदार्थ खाऊन हिरड्यांच्या वेगवेगळ्या समस्या आणि मग तोंडाला घाण वास येणं वाढू शकतं. मात्र याला पावसाळा कारणीभूत नसतो, तर या काळात बदललेल्या जीवनशैलीचा परिणाम असतो.

पावसाळ्यात अनेक लोक जास्त गोड पदार्थ खातात. कमी पाणी पितात आणि दात स्वच्छ करायचा कंटाळा करतात. त्यामुळे दातांवर प्लाक (चिकट थर) साचतो. हा प्लाक वेळेवर साफ नाही केला, तर हिरड्यांना सूज येणे, त्यातून रक्त येणे आणि तोंडाला घाण वास येणे असे त्रास व्हायला सुरुवात होते.

दातांवर साचलेला प्लाक नियमित ब्रश आणि फ्लॉसने साफ नाही केला तर पुढे समस्या होऊ शकतात.

* हिरड्यांतून रक्त येणं
* हिरड्यांना सूज येणं
* तोंडाला सतत घाण वास येणं
* दात संवेदनशील होणं
* सुरुवातीच्या टप्प्यात हिरड्यांचे आजार

वेळेवर उपचार आणि योग्य काळजी घेतल्यास या समस्या सहज नियंत्रणात येऊ शकतात.

अनेकांना वाटतं की तोंडाला घाण वास फक्त कांदा, लसूण किंवा मसालेदार पदार्थांमुळे येतो; पण कायम घाण वास येत असेल तर ते हिरड्यांच्या आजाराचं सुरुवातीचं लक्षण असू शकतं. दात आणि हिरड्यांच्या कडेला प्लाकचा चिकट थर साचला की त्यात जंतू वाढू लागतात. हे जंतू अन्नाचे अडकलेले कण बारीक करून तोंडातून घाण वास यायला कारणीभूत ठरतात. वेळेवर उपचार नाही केले, की पुढे हिरड्यांचे गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

**हिरड्या निरोगी ठेवण्यासाठी काय करावं?**

* दिवसातून दोन वेळा फ्लोराईड्युक्त टूथपेस्टने दात घासा.
* फ्लॉस किंवा इंटरडेंटल ब्रशने दातांमधील अन्नकण काढा.
* जीभ हलक्या हाताने स्वच्छ करा.
* दिवसभर पुरेसे पाणी प्या.
* जेवणानंतर तोंड स्वच्छ धुवा.
* गोड पदार्थ आणि साखरयुक्त पेये कमी घ्या.
* सहा महिन्यांनी एकदा दंतचिकित्सकांकडे तपासणी करा.

# का जडतो उच्च रक्तदाब?



कुठे चुकतो आपण?

उच्च रक्तदाबाचा त्रास जडलेल्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढते आहे. अनेक तरुणांना उच्च रक्तदाब जडू लागला आहे. उच्च रक्तदाब हा जीवनशैलीशी संबंधित विकार असून यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळतं. दैनंदिन आयुष्यातल्या काही सवयी उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतात. कोणत्या आहेत या सवयी? जाणून घेऊ.

* बैठी जीवनशैली उच्च रक्तदाबाला निमंत्रण देते. सतत बसून राहिल्यामुळे ही व्याधी जडण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. बैठ्या कामामुळे शरीराभोवती चरबी साठू लागते. वजन वाढतं. आणि याची परिणती उच्च रक्तदाबामध्ये होते. उच्च रक्तदाबाचा धोका टाळण्यासाठी नियमित व्यायाम आणि शारीरिक हालचाल करणं गरजेचं आहे.
* मद्यपानामुळे उच्च रक्तदाबाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे मद्याचं सेवन प्रमाणात करा.
* मीठाचं अतिसेवन उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतं हे आपण जाणतो. वेफर्स, फरसाण, लोणची, पापड, प्रक्रिया केलेले पदार्थ यामध्ये मिठाचं प्रमाण अधिक असतं. मिठाच्या अतिसेवनामुळे मूत्रपिंड पाणी राखून ठेवतात. यामुळे रक्तवाहिन्यांवरचा ताण वाढतो आणि उच्च रक्तदाब जडू शकतो.
* विशिष्ट औषधांमुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतंही औषध घेऊ नका.
* ताण हे सुद्धा उच्च रक्तदाबाचं महत्त्वाचं कारण ठरू शकतं. याशिवाय धूम्रपान, फळं आणि भाज्यांचं सेवन न करणं तसंच उच्च रक्तदाबाचा कौटुंबिक इतिहास यामुळेही ही व्याधी जडू शकते.

# वारंवार पाय का मुरगळतो?



असे का होते?

बहुतेक वेळा पाय आतल्या बाजूला वळतो (इन्व्हर्शन इन्जुरी) आणि घोट्याच्या बाहेरील लिगामेंटवर अचानक ताण येतो. त्यामुळे त्या लिगामेंटमध्ये सूक्ष्म किंवा मोठी इजा होऊ शकते. सुरुवातीला वेदना, सूज आणि चालताना त्रास होणं ही लक्षणं दिसतात.

योग्य उपचारांमुळे लिगामेंटला झालेली इजा हळूहळू भरून निघते; मात्र लिगामेंट बरी झाली म्हणजे घोटा पूर्णपणे पूर्वीसारखा झाला, असं नेहमीच होत नाही.

आपण लिगामेंटचं काम फक्त दोन हाडांना जोडून ठेवणं एवढंच समजतो; पण त्याच्यामध्ये असंख्य सूक्ष्म संवेदनाक्षम पेशी असतात. या पेशी सतत मेंदूला घोटा कोणत्या दिशेला आहे, पायावर किती वजन आहे, शरीराचा तोल बिघडतो आहे का यासंदर्भातील माहिती पाठवत असतात.

या माहितीच्या आधारावर मेंदू लगेच स्नायूंना योग्य सूचना देतो आणि आपण पडण्यापासून वाचतो. घोटा मुरगळल्यानंतर लिगामेंटबरोबरच या संवेदनाक्षम पेशींनाही इजा होऊ शकते. परिणामी मेंदूपर्यंत अचूक माहिती जात नाही. मग स्नायूंना योग्य वेळी प्रतिक्रिया देता येत नाही आणि पुन्हा घोटा मुरगळण्याची शक्यता वाढते. यालाच 'प्रोप्रियोसेप्शन' म्हणजे शरीराच्या स्थितीची जाणीव कमी होणं असं म्हणतात.

घोट्याला दुखापत झाल्यानंतर ही संपूर्ण प्रणाली काही काळ विस्कळीत होऊ शकते. म्हणूनच अनेक रुग्ण म्हणतात, 'घोटा दुखत नाही, पण तो स्थिर वाटत नाही.' ही भावना अनेकदा संतुलन आणि 'प्रोप्रियोसेप्शन' कमी झाल्याचं लक्षण असू शकते.

# हवामान बदलाने झोपेचे खोबरे



जाणून घ्या

हवामान बदलाचा विपरीत परिणाम हा भारतीयांच्या झोपेवरदेखील होऊ लागला असून, याबाबत भारत एक जागतिक हॉटस्पॉट बनल्याचे 'क्लायमेंट सेंट्रल'च्या अहवालातून उघड झाले आहे. झोप कमी झाल्यामुळे त्याचा व्यक्तीचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. केवळ हवामान बदलामुळे गमावलेल्या आठ ते नऊ तासांच्या झोपेचा यात समावेश आहे. जागतिक पातळीवर (२०२०-२०२५) रात्रीच्या उष्णतेमुळे व्यक्तीने दरवर्षी सरासरी सुमारे ५६ तासांची झोप गमावली आहे.

झोपेच्या वार्षिक नुकसानीपैकी अंदाजे सहा तास किंवा दहा टक्क्यांहून अधिक नुकसान हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या उष्णतेमुळे होत आहे. जागतिक स्तरावर काही प्रदेश आणि शहरांमध्ये त्याचा प्रभाव लक्षणीयरीत्या अधिक असल्याचे दिसून येते. आधीच रात्रीचे तापमान अत्यंत उष्ण असते, अशा ठिकाणी याचा मोठा परिणाम दिसून आला. जगातील एक हजार ३३८ प्रमुख शहरांमध्ये सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीपासून हवामान बदलाशी संबंधित तापमानवाढीमुळे होणाऱ्या झोपेच्या नुकसानीचे प्रमाण किमान दुप्पट झाले आहे.

रात्रीच्या उष्णतेमध्ये तीव्र चढउतार पाहायला मिळत असल्याने त्याचा झोपेवर परिणाम होतो. झोपेतील व्यत्यय ही सार्वजनिक आरोग्य आणि मानवी उत्पादकता या दोन्हींसाठी धोकादायक बाब मानली जावी. उत्तम आरोग्यासाठी प्रौढांना रात्री सात ते नऊ तासांच्या झोपेची गरज असते. रात्रीच्या तापमानातील वाढ मानवी झोपेला हानी पोहोचविते, याचा मोठा परिणाम कमी उत्पन्न असलेल्या देशांमधील नागरिक, वृद्ध आणि महिलांवर दिसून येतो.

**कमी झोपेचे दुष्परिणाम**

* हृदयविकार
* ढासळलेले मानसिक आरोग्य
* रोगप्रतिकार शक्तीत कमतरता
* उत्पादकतेमध्येही घट
* वजन वाढते
* मधुमेह
* अतिताण
* अकाली मृत्यूचा धोकाही वाढतो.



# घट्ट पट्टा बांधणे हानीकारक

चुकीच्या सवयी

डॉ. कुंदन गायकवाड

आजकाल लोक घट्ट बेल्ट बांधणे हे स्टाईल आणि स्मार्टनेसचे लक्षण मानतात. पण घट्ट बेल्ट घालणे हानिकारक आहे. घट्ट पट्टा घालताना पोट, कंबर आणि आजूबाजूच्या नसांवर जास्त दाब पडतो. त्यामुळे अन्न व्यवस्थित पचत नाही. गॅस आणि आम्लतेची समस्या उद्भवू शकते. जास्त वेळ घट्ट पट्टा घातल्याने पाठदुखी, मणक्यावर परिणाम आणि पाय सुन्न होऊ शकतात. ही सवय हळूहळू गंभीर होऊ शकते. घट्ट पट्टा घातल्याने पेल्विक क्षेत्रावर म्हणजेच कंबर आणि खालच्या ओटीपोटावर जास्त दबाव पडतो. यामुळे त्या भागाच्या रक्ताभिसरणावर परिणाम होतो आणि तापमान वाढते. शुक्राणूंच्या निर्मितीसाठी, पेल्विक क्षेत्राचे तापमान सामान्यपेक्षा थोडे कमी असायला हवे. घट्ट पट्ट्यामुळे तापमानात वाढ झाल्यास शुक्राणूंची गुणवत्ता आणि संख्या दोन्ही कमी होऊ शकते.

घट्ट पट्टा पोटाभोवतीच्या नसा आणि रक्तवाहिन्यांवर दबाव आणतो. त्यामुळे तिथे रक्त व्यवस्थित पाहोचू शकत नाही. रक्ताभिसरण मंदावते. घट्ट बेल्ट घातल्याने पचनसंस्थेवर 'टॉर्निकेट' लावल्याप्रमाणे दबाव येतो. यामुळे ॲसिड रिफ्लक्स, गॅस आणि अपचन सारख्या समस्या उद्भवू शकतात. बेल्ट घट्ट करताच श्वास घेण्यास किंवा हालचाल करण्यास त्रास होत असेल, पोटात किंवा कंबरेमध्ये वेदना होत असतील किंवा बेल्ट तुमच्या त्वचेवर खुणा सोडत असेल, तर समजून घ्या की बेल्ट खूप घट्ट आहे. बेल्ट पुरेसा सैल असावा जेणेकरून तुम्ही बसून सहज श्वास घेऊ शकाल.

# उभे राहून काम केल्याने...



जीवनशैली

बदलती जीवनशैली, घर-कार्यालयाची दुहेरी जबाबदारी यामुळे महिलांच्या दिनचर्येत मोठे बदल होत असून, दीर्घकाळ उभे राहून काम केल्यामुळे महिलांच्या शरीरावर दीर्घकालीन परिणाम होत आहेत. सुरुवातीला किरकोळ वाटणाऱ्या तक्रारी पुढे पन्नाशीनंतर गंभीर स्वरूप धारण करण्याची शक्यता असल्याने वेळेतच जीवनशैलीत बदल करणे आवश्यक आहे.

स्वयंपाकघरातील बहुतांश कामे उभे राहून करणे, बसण्या-उठण्याच्या हालचाली कमी होणे, उभ्या-उभ्याच जेवणे किंवा काम करता करता खाणे या सर्वांमुळे शरीराच्या हालचाली मर्यादित होत असून, त्याचा परिणाम स्नायू, सांधे आणि एकूणच शारीरिक क्षमतेवर होत आहे. सतत उभे राहिल्यामुळे शरीराचा मोठा भार गुडघे आणि पायांवर पडतो. परिणामी वजन वाढणे, गुडघेदुखी, पायांना सूज येणे, सतत थकवा जाणवणे तसेच स्नायूंमध्ये ताण निर्माण होणे अशा समस्या वाढत आहेत. दीर्घकाळ उभे राहून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये कंबरदुखी, पायदुखी, स्नायूंचा थकवा, पाय सुजणे आणि रक्ताभिसरणाशी संबंधित समस्या वाढण्याची शक्यता असते. सुरुवातीला या तक्रारी किरकोळ वाटल्या, तरी वाढत्या वयानुसार त्यांची तीव्रता वाढू शकते. अशा जीवनशैलीमुळे पन्नाशीनंतर बहुतांश स्त्रियांमध्ये स्थूलता, पोटाचा घेर वाढणे, चरबी वाढणे, यातूनच मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड, कोलेस्ट्रॉल यासारख्या सहव्याधी जडतात.

महिलांनी शक्य तितक्या वेळा सलग तासनतास उभे राहणे टाळणे, जमिनीवर मांडी घालून बसून पुन्हा उठण्याच्या नैसर्गिक हालचाली करणे आणि घरात नियमित चालणे आवश्यक आहे. साध्या शारीरिक क्रियांमुळे शरीराची लवचीकता टिकून राहते. स्नायू व सांधे सक्रिय राहतात. थकवाही कमी जाणवतो. घरातील कामे जलद उरकण्यापेक्षा योग्य पद्धतीने आणि शरीराला आवश्यक विश्रांती देणे महत्त्वाचे आहे. तासन् तास उभे राहून काम केल्याने रक्ताभिसरण प्रक्रिया मंदावते. मेंदूला रक्तपुरवठा कमी होतो. सतत उभे राहिल्याने अधिक स्त्रियांमध्ये खुब्याच्या समस्या आणि व्हेरिकोज व्हेन्स या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे काही वेळ खाली बसणे व पुन्हा उभे राहणे ही क्रिया करत रहावी. प्रत्येक महिलेने दररोज व्यायाम करावा. जेवल्यानंतर स्त्रियांनी वज्रासनात बसावे, यामुळे रक्ताभिसरण प्रक्रिया चांगली होते.

# २० टक्के महिलांमध्ये 'पीएमओएस'



आरोग्यवेध

भारतातील महिलांमध्ये 'पॉलीएंडोक्राइन मेटाबॉलिक ओव्हेरियन सिंड्रोम' (पीएमओएस) चे प्रमाण झपाट्याने वाढत असून आता देशातील प्रत्येक पाचपैकी एक महिला या विकाराने प्रभावित असल्याचे विविध अभ्यासांकधून समोर आले आहे. पूर्वी हा आजार 'पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम' (पीसीओएस) म्हणून ओळखला जात होता. हा केवळ अंडाशयांचा विकार नसून संपूर्ण शरीरातील हार्मोन्स आणि चयापचयाशी संबंधित आजार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भारतीय महिलांमध्ये वाढती स्थूलता, बैठे जीवन, प्रक्रिया केलेले अन्न, ताणतणाव, झोपेचा अभाव आणि इन्सुलिन रेझिस्टन्स ही 'पीएमओएस' वाढण्यामागील प्रमुख कारणे आहेत. विशेषतः किशोरवयीन मुली आणि २० ते ३० वर्षे वयोगटातील महिलांमध्ये हा विकार अधिक प्रमाणात दिसून येत आहे.

'पीएमओएस' हा हार्मोन्समधील असंतुलनामुळे होणारा विकार आहे. यामध्ये मासिक पाळी अनियमित होणे, वजन झपाट्याने वाढणे, चेहऱ्यावर आणि शरीरावर अतिरिक्त केस येणे, मुरुमांची समस्या, केस गळणे, गर्भधारणेत अडचणी आणि मानसिक ताण अशी अनेक लक्षणे दिसून येतात. अनेक महिला ही लक्षणे सामान्य समजून दुर्लक्ष करतात. त्यामुळे निदान उशिरा होते आणि पुढे मधुमेह, हृदयविकार, उच्च रक्तदाब व इतर चयापचयाशी संबंधित आजारांचा धोका वाढतो.

भारतीय महिलांमध्ये इन्सुलिन रेझिस्टन्सचे प्रमाण तुलनेने जास्त असल्याने 'पीएमओएस' चा परिणाम अधिक गंभीर ठरू शकतो. शरीरातील पेशी इन्सुलिनला योग्य प्रतिसाद देत नसल्यामुळे रक्तातील साखर वाढते आणि हार्मोन्सचे संतुलन बिघडते. यामुळे अंडोत्सर्जनावर परिणाम होतो आणि प्रजनन क्षमतेवरही परिणाम होऊ शकतो. पीएमओएस हा संपूर्ण आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम करणारा मेटाबॉलिक आजार आहे.

जागतिक वैद्यकीय तज्ज्ञांनी 'पीसीओएस'ऐवजी 'पीएमओएस' हे नाव स्वीकारण्यामागील उद्देशही हाच आहे. प्रत्यक्षात या विकाराचा मुख्य संबंध हार्मोनल आणि मेटाबॉलिक बिघाडाशी आहे. नव्या नावामुळे रुग्ण आणि डॉक्टर दोघांचाही भर केवळ प्रजनन समस्यांवर न राहता मधुमेह, स्थूलता, हृदयविकार आणि जीवनशैलीतील सुधारणांकडे अधिक राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. 'पीएमओएस' वर कायमस्वरूपी औषध नसले, तरी योग्य जीवनशैली स्वीकारल्यास त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. नियमित व्यायाम, संतुलित आहार, वजन नियंत्रण, पुरेशी झोप आणि ताणतणाव कमी करणे हे उपचारांचे प्रमुख आधार आहेत. काही रुग्णांना हार्मोन्सचे संतुलन राखण्यासाठी किंवा इन्सुलिन रेझिस्टन्स कमी करण्यासाठी औषधांची गरज लागू शकते. 'पीएमओएस' असलेल्या महिलांनी नियमितपणे रक्तातील साखर, एचबीए १ सी, लिपिड प्रोफाइल आणि चयापचयाशी संबंधित इतर तपासण्या करून घ्याव्यात. वेळेत निदान आणि उपचार सुरू केल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते.

नवसंशोधन

## पोटावरची चरबी ठरते घातक!



सुटलेलं पोट खूप धोकादायक असतं. पोटावरच्या चरबीमुळे अनेक व्याधी जडू शकतात. पोटावर साठलेल्या चरबीमुळे हृदयविकारासह पक्षाघात, अस्थमासह इतर काही विकार होऊ शकतात. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. एकदा हृदयविकाराचा झटका आलेल्यांच्या पोटावर चरबी साठली असेल तर त्यांना दुसऱ्यांदा हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. स्वीडनमधल्या कॅरोलिन्स्का संस्थेत याबाबत संशोधन करण्यात आलं. त्यावरून काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यामुळे नियमित व्यायाम आणि पोषक आहाराचं सेवन करून वजन नियंत्रणात ठेवणं गरजेचं आहे.

दंतारोग्य

## टूथपेस्ट ठरू शकते घातक...



सकाळी उठल्यावर आपण सर्वात आधी दात घासतो. दात घासल्यानंतर तोंडाचं आरोग्य उत्तम राहील, असं आपल्याल्या वाटतं. पण प्रत्यक्षात टूथपेस्टमधल्या काही घटकांमुळे त्रास होऊ शकतो. टूथपेस्टमध्ये फ्लोराइडसह इतर काही घातक रसायनं असतात. दात घासताना थोडीफार पेस्ट पोटातही जाते. इतकंच नाही, तर टूथपेस्टमधल्या ग्लिसरिनमुळे दातांवर थर तयार होतो आणि हा थर दातांच्या आरोग्यासाठी मारक ठरू शकतो. यामुळे दात कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे टूथपेस्ट खरेदी करताना त्यातल्या रसायनांची माहिती घ्या.

जपणूक केसांची

## टाळूची योग्य देखभाल



आपण केसांची काळजी घेतो. पण टाळूवरच्या त्वचेकडे आपलं दुर्लक्ष होतं. केसांचं आरोग्य जपण्यासाठी टाळूकडेही विशेष लक्ष द्यायला हवं. टाळूची स्वच्छता खूप महत्त्वाची आहे. केस धुताना टाळूलाही शँपू लावायला हवा. यामुळे टाळूवरची धूळ, घाण निघून जाते. अर्थात टाळू जास्त वेळा धुवू नये. टाळू सतत धुतल्यामुळे ती कोरडी होऊ शकते. नियमितपणे तेल लावायला हवं. तेलामुळे टाळूला ओलावा मिळतो. टाळू निरोगी असेल तर तुमचे केसही छान वाढू लागतील.

आजीबाईचा बटवा

## औषधी डिंक



डिंक खूप औषधी असतो. थंडीत डिंकाचे लाडू खाल्ले जातात. डिंकाच्या लाडूसोबत दूध प्यायल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. थंडीच्या काळातल्या विविध विकारांचा सामना करायला शरीर सक्षम होतं. डिंकामुळे हाडं बळकट होतात, स्नायूंना खाद्य मिळतं. पाठीचा कणा बळकट होण्यासाठी डिंक खायला हवा. भाजलेल्या डिंकाच्या नियमित सेवनामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. अशक्तपणा आला असेल तर डिंक खाता येईल. गर्भवती महिलांनी डिंक खायला हवा. मासिक पाळीबाबतच्या तक्रारीही डिंकामुळे दूर होतात.

# कांतारा इफेक्टने मार्कंडेय मिरवणुकीत रंगली भूतकोला कला

## दहा कलाकारांच्या वराह, गुलिगा देव, भूतकोला नृत्याने शोभायात्रेला दाक्षिणात्य झलक

नगर – नारळी पौर्णिमेनिमित्त श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टच्या वतीने दरवर्षी काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेत यंदा श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानने सादर केलेल्या आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कांतारा चित्रपटातून लोकप्रिय झालेल्या कर्नाटकातील पारंपरिक भूतकोला कलेचा प्रभाव असलेले वराह रूपम, गुलिगा देव आणि भूतकोला नृत्याचे सादरीकरण मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले. दहा कलाकारांनी केलेल्या या सादरीकरणामुळे संपूर्ण शोभायात्रेला एक वेगळे, थरारक आणि अद्भूत रूप प्राप्त झाले.

श्री मार्कंडेय मंदिर, गांधी मैदान येथून सुरू झालेली ही शोभायात्रा चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट, गंगुबाई तालीम, नवरंग व्यायामशाळा, बागडपट्टी, पुणे मार्गे पुन्हा श्री मार्कंडेय मंदिर येथे दाखल झाली. मार्गातील प्रत्येक चौकात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत होती. मात्र यंदाच्या मिरवणुकीत गर्दीला विशेष आकर्षित करणारे केंद्र ठरले ते श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी सादर केलेले भूतकोला नृत्य.



श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टच्या मिरवणुकीत भूतकोला कलेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कर्नाटकातील पारंपरिक भूतकोला परंपरेत ज्या पद्धतीने कलाकार आकर्षक वेशभूषा, रंगभूषा आणि प्रभावी देहबोलीतून देवतांचे स्वरूप साकारतात, त्याच धाटणीचा अनुभव नगरकरांना या शोभायात्रेत मिळाला. मुख्य कलाकाराने साकारलेले वराहदेवाचे रूप विशेष लक्षवेधी ठरले, तर इतर कलाकारांनी गुलिगा देव, भूतकोला आणि अन्य पारंपरिक रूपे साकारत वातावरणात वेगळीच ऊर्जा निर्माण केली. त्यांच्या आगळ्या वेशभूषा, चेहऱ्यावरील रंगभूषा, हालचाली आणि नृत्याची लय पाहून नागरिक अक्षरशः थक्क झाले. विशेष म्हणजे या सादरीकरणात कांतारा चित्रपटाची आठवण करून देणारा प्रभाव जाणवत होता. कांतारामधील पारंपरिक लोककलेचा जो थरारक अनुभव प्रेक्षकांना जाणवतो, त्याच धाटणीचा कांतारा इफेक्ट या मिरवणुकीत अनुभवायला मिळाला. कलाकारांच्या प्रवेशापासून त्यांच्या नृत्याच्या प्रत्येक हालचालीपर्यंत प्रेक्षकांच्या नजरा त्यांच्यावर खिळून राहिल्या. काही ठिकाणी अग्नितांडवाची झलक, आगीचे मोठे फवारे आणि प्रभावी सादरीकरणामुळे मिरवणुकीतील वातावरण अधिकच भारावून गेले.

या उपक्रमासाठी ऋषीकेश सामल, ओंकार बुरगुल, अमर सादुल, यश सामल, माधव उडता, रोहन सामल, वरद अन्नलदास, ओंकार अन्नलदास, कार्तिक गज्ञम, शुभम कारामपुरी, महावीर कोंड्याल, साई सामल, आकाश हरबा, तनिष्क सिरसूल, शिवा कोंडा, गौरव कन्ना, विनीत इराबत्तीन, रितेश मेरगु, समर्थ बोडखे, अक्षय बुरला, विपुल आडेप, तनिष्क कोंडा, ईश्वर कैरमकोंडा, वेदांत देशपांडे, बालाजी श्रीराम, दर्शन कैरमकोंडा, संतोष उषाकोयल, श्रीकांत गज्ञम आणि मयूर जाधव यांच्यासह महिला मंडळातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानच्या भूतकोला नृत्याने या उत्साहाला एक वेगळीच उंची दिली. कलाकारांच्या सादरीकरणामुळे प्रत्येक चौकात काही क्षणांसाठी जणू कर्नाटकातील पारंपरिक सांस्कृतिक विश्वच नगरच्या रस्त्यावर अवतरल्याचा भास होत होता.



## गुरुवाणी – ३४
### अच्छा कर के पछताना नहीं

पुण्याचा आश्रव झाल्यावर काही वेळा त्याचे पुण्य फळ मिळत नाही. कारण बंध करताना गडबड होतें. राजा श्रेणिकच्या काळात एक मोठा वैभवशाली व्यक्ती होता. एकदा रात्री अतिवृष्टीमुळे नदीला महापूर येतो. राजा श्रेणिक महालाच्या गच्चीवरून पाहतो. त्याला दिसते, ती धनिक व्यक्ती महापूरात नदीतून वाहत येणारे लाकडं गोळा करत असतो. राजाने आपल्या सेवकांना त्या व्यक्तीला आणायला पाठवले. ती व्यक्ती म्हणते, माझ्याकडे एक बैल आहे, मला त्याची जोडी पाहिजे. राजा म्हणतो, माझ्या पशुधनातून एक बैल घेऊन जा. ती व्यक्ती म्हणते, 'तुमच्या पशु शाळेत माझ्या बैलाचा जोड ठरेल असा एकही बैल नाही'. हे ऐकून राजा अचंबित होतो. राजा उत्सुकतेने त्याच्याकडील पहिला बैल पहायला जातो. तो बैल मोठ्या हवेलीत अंधारात तळघरात असतो. तो बैल हिऱ्यासारखा खूप तेजस्वी असतो. राजा श्रेणिक म्हणतो, इतका श्रेष्ठ बैल असूनही तू असं का जगतो. या बैलाची जोडी बनवून तुला उपयोग काय? ती व्यक्ती म्हणते, 'ते मला माहित नाही पण माझी एकच इच्छा आहे की अशीच बैलजोडी पाहिजे'. राजा श्रेणिक त्या व्यक्तीच्या या जगण्याचा अर्थ समजून घेण्यासाठी भगवान महावीरांकडे गेले . तीर्थंकरांनी सांगितले, हे त्या व्यक्तीच्या पूर्व जन्माचे रहस्य आहे. पूर्व जन्मी ती व्यक्ती खूप धार्मिक होती, दानशूर होती. एक दिवस एक तपस्वी त्याच्या दारात गोचरीसाठी आला. त्या दानशूराने स्वयंपाक घरात शोधाशोध केली तर त्याला एका डब्यात एकच लाडू दिसला, तो त्याने तपस्वीला दिले. तपस्वी गेल्यावर दानशूर व्यक्तीने डब्यातील लाडवाचे उरलेले काही कण स्वतः खाल्ले. त्याला त्याची चव खुप छान लागली. त्याच्या मनात आले, अरे मी उगाच सगळा लाडू तपस्वीला दिला. दिवसभर हाच विचार त्याच्या मनात होता. त्यामुळे त्याच्या पुण्याला 'लॉक' लागले. त्याने पुण्याचा आश्रव केला पण बंध नाही झाले. त्यामुळे या जन्मी त्याची अशी अवस्था झाली आहे. इसलिए 'कभी अच्छा कर के पछताना नहीं.' बहुतांश आईवडील मुलांसाठी सगळं करतात आणि नंतर मुलांनी वेगळी वाट धरल्यावर तळतळ करतात. चांगले करून त्याचा पश्चाताप करू नका. चांगले केले तर त्याचा आनंद माना. तपस्या केल्यावर डोके दुखले तर तपस्येला दोष देऊ नका. संकल्प करा की, मी कोणासाठी चांगले केले तर ते बोलून दाखवणार नाही.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# नेप्तीत गोसावी बाबांचा भंडारा उत्सव साजरा

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्री गोसावी बाबांचा भंडारा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पुंड परिवाराच्या वतीने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक धार्मिक परंपरा जपत पुंड परिवाराने यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले होते अशी माहिती रामदास फुले यांनी दिली

सिताराम पुंड व प्रा. भाऊसाहेब सिताराम पुंड यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात श्री गोसावी बाबांना पंचामृत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर नंदनवन उद्योगसमूहाचे संचालक बाबासाहेब जाधव, शिवसेना विधानसभा प्रमुख नगर शहर दत्ता जाधव व रामदास फुले, माजी सरपंच अंबादास पुंड, विलास चौरे, ग्रामपंचायत सदस्य रामदास पुंड, आसाराम पुंड, प्रा. एकनाथ होले, प्रा. बबन कांडेकर तसेच वेताळबाबा मित्रमंडळ यांच्या हस्ते श्री गोसावी बाबांची विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी भाविकांनी फुलांची उधळण करत 'गोसावी बाबा की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून सोडला. यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

## आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या सिलेक्शन ट्रायलसाठी पिसाळ याची निवड



नगर – ब्राझील येथे पार पडणाऱ्या इंटरनॅशनल स्कूल फेडरेशनच्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या सिलेक्शनट्रायलसाठी एकलव्य तायक्वांदो अकॅडमीचा खेळाडू विराज गजेंद्र पिसाळ याची निवड झाली आहे. आगामी १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान छत्तीसगड येथे या सिलेक्शन ट्रायल्स पार पडणार आहेत.

या महत्त्वपूर्ण चाचणीसाठी विराजकडून अत्यंत मेहनतीने आणि कसोटीने सराव केला जात आहे. त्याच्या या यशामध्ये प्रशिक्षक अल्ताफ खान, प्रशिक्षक गणेश वंजारे, योगेश बिचीतकर, सचिन मरकड आणि मंगेश आहेर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओबासे, उपाध्यक्ष घनश्याम सानप, महासचिव गफार पठाण आणि कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी यांनीही विराजच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.

# रोटरीचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ओलायंका बाबलोला यांच्या हस्ते डॉ.सुधा कांकरिया यांना नॅशनल रोटरी चॅम्पीयन अवॉर्ड प्रदान

नगर – नुकत्याच गोवा येथे झालेल्या रोटरीच्या राष्ट्रीय अधिवेशनात रोटरीचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ओलायंका बाबलोला यांच्या हस्ते डॉ. सुधा कांकरिया यांना नॅशनल रोटरी चॅम्पीयन अवॉर्ड प्रदान करण्यात आला. सदर प्रसंगी आर आय डायरेक्टर के. पी. नागेश, तसेच रोटरी प्रांत ३१३२ चे प्रांतपाल जयेश पटेल, प्रांत ३१७० चे प्रांतपाल डॉ. लिनी डिकोस्टा व्यासपीठावर उपस्थित होते.



डॉ. सुधा कांकरिया यांना नॅशनल रोटरी चॅम्पीयन अवॉर्ड प्रदान करताना रोटरीचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ओलायंका बाबलोला.

गेल्या चार दशकांहून अधिक काळ डॉ. सुधाताई कांकरिया यांनी स्त्री जन्माचे स्वागत करा अभियानासाठी अविरत व नि:स्वार्थ कार्य करून महाराष्ट्रातील सामाजिक मानसिकतेत सकारात्मक परिवर्तन घडविले आहे. भारतातील मुलगी वाचवा, बेटी बचाओ चळवळीच्या आद्यप्रवर्तक म्हणून त्यांच्या कार्याची नोंद वंडर बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली आहे. रोटरी ही आंतरराष्ट्रीय संस्था असून रोटरीच्या बेटी बचाओ या समितीचे डॉ. सुधाताई नेतृत्व करीत आहेत. त्यांच्याव्दारे महाराष्ट्रातील १०० पेक्षा जास्त रोटरी क्लब बेटी बचाओ या चळवळीमध्ये सहभागी झाले आहेत. म्हणूनच डॉ. सुधाताईंची निवड नॅशनल रोटरी चॅम्पीयन पुरस्कारासाठी झाली आहे, असे प्रांतपाल जयेश पटेल यांनी सांगितले.

नेत्रदान, पोलिओ निर्मूलन, पर्यावरण संवर्धन, बालनाट्य आणि राजयोग ध्यान अशा विविध क्षेत्रांतही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. डॉ. सुधा कांकरिया यांना स्त्री जन्माचे स्वागत करा या चळवळीसाठी तत्कालीन राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते नॅशनल अवॉर्ड फॉर सेव्ह गर्ल चाईल्ड मिशन इन इंडीया पुरस्कार, बालरंगभुमीतील योगदानासाठी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते अ. भा. मराठी नाट्य परिषदेचा विशेष गौरव पुरस्कार, पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते महाराष्ट्राचे कृषीरत्न पुरस्कार, वैद्यकिय क्षेत्रातील सेवाभावी कार्यासाठी टाईम्स हेल्थ आयकॉन पुरस्कार, साहित्य क्षेत्रातील उत्तम कार्याबद्दल राज्यस्तरीय शब्दशारदा पुरस्कार प्राप्त झाला आहे. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते जीवन साधना गौरव पुरस्काराच्याही डॉ. सुधाताई मानकरी ठरल्या आहेत.

# जेके सुपर सिमेंट तर्फे 'टेक कनेक्ट' कार्यक्रम साजरा

नगर – जेके सुपर सिमेंटच्या वतीने अहिल्यानगर येथे 'टेक कनेक्ट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शहर व परिसरातील इंजिनियर, आर्किटेक्ट, यांच्यासोबत तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण तसेच कंपनीच्या विविध उपक्रमांची माहिती देणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन इंजि.यश शहा, बाळासाहेब शिंदे, रोहित चव्हाण जे के सिमेंट चे जयसिंग कदम, अखिलेश नितनवरे, विकास ठाकूर, श्रीकांत थोरात, तसेच जे के सिमेंटचे डीलर, आदित्य ट्रेडर्स,कालिका सेल्स, सुजित ट्रेडर्स, साई ट्रेडर्स यांच्या हस्ते करण्यात आले.



'टेक कनेक्ट' कार्यक्रमात भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करताना इंजि.यश शहा, बाळासाहेब शिंदे, रोहित चव्हाण जयसिंग कदम, अखिलेश नितनवरे, विकास ठाकूर, श्रीकांत थोरात आदी.

यावेळी अहिल्यानगर परिसरातील अनेक इंजिनिअर्स, आर्किटेक्ट तसेच जेके सिमेंटचे अधिकारी आणि कंपनीचे चॅनेल पार्टनर उपस्थित होते. कार्यक्रमात जेके सिमेंटचे एस एच पुणे सेल्स जयसिंग कदम, एस एच पुणे सीटीएस अखिलेश नितनवरे आणि एएसएम विकास ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जयसिंग कदम यांनी उपस्थित इंजिनिअर्स, आर्किटेक्ट यांचे स्वागत करून जेके सिमेंटच्या कार्यपद्धती, उद्दिष्टे आणि भविष्यातील दृष्टिकोनाबाबत मार्गदर्शन केले. तसेच अखिलेश नितनवरे यांनी जेके सुपर सिमेंट याबाबत सविस्तर तांत्रिक माहिती दिली.कार्यक्रमाच्या माध्यमातून बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञान, दर्जेदार बांधकाम साहित्य आणि जेके सिमेंटच्या तांत्रिक सेवांबाबत उपयुक्त माहिती मिळाली. उपस्थित इंजिनिअर्स, आर्किटेक्ट यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध तांत्रिक विषयांवर संवाद साधला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एएसएम विकास ठाकूर, आरई श्रीकांत थोरात, एसई अविनाश नाईकवाडे, एसई विवेक पाटील, डीओएम सुरेश डोखे आणि डीओएम सुरज मुंडे यांनी विशेष सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी जयसिंग कदम यांनी उपस्थित सर्व, इंजिनिअर्स आणि आर्किटेक्ट यांचे आभार मानले. तांत्रिक ज्ञान, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि मजबूत व्यावसायिक संबंध निर्माण करण्याच्या उद्देशाने जेके सुपर सिमेंटच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

# मसापच्या अहिल्यानगर शाखाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ज्ञानदेव पांडुळेंचा सत्कार

नगर – महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे अहिल्यानगर शाखेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल साहित्यिक ज्ञानदेव पांडुळे यांचा महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे च्या वतीने अध्यक्ष योगेश सोमण व कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



मसापच्या अहिल्यानगर शाखाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ज्ञानदेव पांडुळे यांचा सत्कार करताना मसापचे अध्यक्ष योगेश सोमण व कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर.

महाराष्ट्र साहित्य परिषदेला शंभर वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे विशेष महत्त्व आहे. या संमेलनाच्या तयारीसाठी स्थानिक पातळीवर आयोजित करण्यात येणारे 'नांदी साहित्य संमेलन' यशस्वी करण्यासाठी अहिल्यानगर शाखेच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. साहित्यिक, साहित्य संस्था, विविध मंडळे आणि साहित्य रसिकांच्या सहभागातून हा उपक्रम अधिक प्रभावी, व्यापक करण्याचा प्रयत्न राहील, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी समन्वयक निखिल पाटील, नरेंद्र फिरोदिया, राजेंद्र उदागे, परिषदेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, साहित्यिक, साहित्यप्रेमी व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





सागर भिंगारदिवे यांचा 'रिपाइं' (आठवले) पक्षात स्वागत करताना केंद्रीय मंत्री रामदास आठवले, जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्यासह पदाधिकारी.

# सागर भिंगारदिवे यांचा 'रिपाइं' (आठवले) मध्ये प्रवेश

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश; संविधानिक मूल्यांसाठी कार्य करण्याचा निर्धार

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले सागर उत्तम भिंगारदिवे यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) मध्ये जाहीर प्रवेश केला. केंद्रीय मंत्री तथा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी रामदास आठवले यांनी भिंगारदिवे यांचे पक्षात स्वागत करून त्यांच्या आगामी सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पक्षप्रवेश झाला. जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी तसेच पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सुनील साळवे सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सागर भिंगारदिवे यांनी सांगितले.

पक्षप्रवेशानंतर बोलताना भिंगारदिवे म्हणाले, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) मध्ये प्रवेश हा माझ्यासाठी केवळ राजकीय पक्षबदल नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आणि भारतीय संविधानाच्या मूल्यांना अधिक ताकदीने पुढे नेण्याचा संकल्प आहे. पक्षाच्या कामात आजी–माजी पदाधिकारी, ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते, युवक तसेच समाजातील विविध घटकांना सोबत घेऊन काम करण्याचा आपला प्रयत्न राहील. पक्षाची एकजूट, संघटनात्मक मजबुती आणि कार्यकर्त्यांचा सन्मान यांना प्राधान्य देत सर्वांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा आदर करून पक्षाची ताकद वाढविण्यासाठी काम करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

वंचित, शोषित, पीडित आणि गरजू घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी संविधानिक मार्गाने संघर्ष करणे, तसेच सामाजिक समता व सामाजिक न्यायाची चळवळ अधिक व्यापक करणे हा आपल्या राजकीय कार्याचा केंद्रबिंदू राहील, असे भिंगारदिवे यांनी सांगितले.

या पक्षप्रवेशावेळी सागर उत्तम भिंगारदिवे यांच्या समर्थनार्थ सहकारी, मित्रपरिवार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांचे भिंगारदिवे यांनी आभार मानले.

या निवडी बद्दल राज्य उपाध्यक्ष श्रीकांत भालेराव, राज्य उपाध्यक्ष विजयराव वाघचौरे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, जिल्हा कार्याध्यक्ष लॉरेन्स स्वामी आदींनी शुभेच्छा दिल्या.

# क्रीडा दिनानिमित्त चित्तथरारक मैदानी खेळांची प्रात्यक्षिके

नगर – खेळांविषयी जनजागृती निर्माण होऊन क्रीडा संस्कृतीला चालना मिळावी, तसेच तरुण पिढीने मैदानी खेळांकडे वळावे, या उद्देशाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दि. २९ सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौकात विविध खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याचे दर्शन घडविले. या उपक्रमामुळे परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते.



राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त प्रोफेसर कॉलनी चौकात खेळांचे चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करताना खेळाडू.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर, जिल्हा ऑलिंपिक संघटना, एकविध खेळ संघटना आणि विविध क्रीडा मंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच ऑलिंपिकवीर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मनपा आयुक्त यशवंत डांगे, शहर वाहतूक शाखेचे पोनि. महेश पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, सतीश शिंदे, मनोज दुल्लम, तसेच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सुनील जाधव, कोमल वाकळे, मनीषा पुंडे उपस्थित होते.

प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले. नगरसेवक करण कराळे, महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी आपल्या भाषणात खेळाचे महत्व विषद केले. कार्यक्रमाची सुरुवात झुंबा नृत्याने झाली. त्यानंतर हॉकीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. पुरलेला मल्लखांब आणि रोप मल्लखांबच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या हृदयाचा ठोका चुकविला. मल्लखांबपटूंनी चित्तथरारक कसरती सादर करुन उपस्थितांची दाद मिळवली. यानंतर सायकलिंग, स्केटिंग, रायफल शूटिंग, तलवारबाजी, व्हॉलीबॉल, ज्युदो, कुस्ती, बॉक्सिंग आणि खो–खो या विविध क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

दरम्यान, इन्फिनिटी सायक्लोथॉन, अहिल्यानगर, बाईक टेक पॉइंट आणि सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना सायकल भेट देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी जलतरण संघटनेचे रावसाहेब बाबर, ऑलिंपिक संघटनेचे शैलेश गवळी, जिल्हा क्रीडा कार्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, प्रवीण कोंढावळे, श्री समर्थ प्रशाळेच्या प्राचार्य वसुधा जोशी, क्रीडा शिक्षक लोंढे, आसिफ शेख, नंदेश शिंदे, कुलकर्णी, प्रा. संजय साठे, सुदर्शन कोतकर, भापकर, सुनील गोडळकर, आदित्य धोपावकर, निलेश मदने, गणेश वारुळे, रामेश्वर चेमटे, विकास परदेशी, शकील शेख, मोहनीराज लहाडे, अल्ताफ कडकाले, क्रीडा भारतीचे वेदपाल, सुधीर चपळगावकर, ऋषिकेश दरंदले, प्रसाद पाटोळे, श्रीरंग कुलकर्णी आणि संजय धोपावकर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रावसाहेब बाबर यांनी केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

